A SHORT HISTORY OF JAGATHGURU Sri Sankarachariya AND HIS SUCCESSORS ON HIS HOLY THRONE

COMPILED BY

Pandit RAMASWAMI SASTRI,

of Thrukodikaval

Narasingampet Post

WITH

the help of Mahratta Pandits.



SRIRANGAM:

SRI VANI VILAS PRESS.

1915.





श्रीजगद्गुरु श्रीशंकराचार्याः

श्रीकाञ्चीकामकोटिपीठाधिपतयः ॥

श्रीवाणीविलासमुद्रायन्त्रालयः श्रीरङ्गम्



॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥

॥ श्रीमन्महागणपतये नमः ॥

॥ श्रीमच्छंकराचार्यचरित्रप्रारम्भः ॥



श्रीमच्चन्द्रकलाकलापचरणाम्भोजातपूजातपः
प्रोद्यद्बोधविधूतमोहतिमिरस्तोमस्य यस्योक्तयः ।
वेलातीतभवाम्बुराशिजठरे सम्मज्जतां तारिका-
स्सोयं शंकरदेशिको वितरतु श्रेयांसि भूयांसि नः ॥

स्वस्ति श्रीमत्परमदयालुपरमेश्वरया कलियुगीं २००० वर्षें झाल्यानन्तर कलिप्राबल्यामुळें या भरतखंडांत सर्व-वैदिकमार्ग भ्रष्ट झाल्यानें जैन बौद्धादि अनेक दुर्मतांची वृद्धी होत आहे असें पाहून, सर्वलोकांवर अनुग्रहकर-ण्याच्या इच्छेनें कुमारविरंची इत्यादि देवानां आत्मसहा-

यार्थ भूमीवर अवतार घ्या अशी आज्ञादेऊन आपण स्वत: केरलदेशांत कालटीग्रामांत राहाणाऱ्या शिवगुरुनामक ब्राह्मण जो (पुत्रहोण्याची इच्छा बाळगून तपश्चर्याकरीत होता. त्याची एक निष्ठा भक्ति पाहून अति प्रसन्नतेनें त्यास वर दिलाकीं मी तुझ्याघरीं अवतार घेईन) त्यावरास पूर्णकरण्या कीरतां त्याची सद्धर्मपत्नी आर्यांबा इच्या उदरीं कलिवर्ष २५९३, नंदननामसंवत्सर वैशाखशुद्ध ५ पुनर्वसु नक्षत्र धनुर्लग्नया शुभमुहूर्तावर अवतारधारण करते झाले— हा पुत्र केवळ ईश्वरावतारच आहे असें जाणून त्याचें नाव शंकर असेठेविलें नतर तिसऱ्यावर्षी चौल कर्म केलें व या-स्वल्पावधीतंच बालक्रीडानंदाचा काहींसा उपभोग घेऊन शिवगुरूब्राह्मण मृत्युपावला पुढें ५ वर्षाच्या वया पर्यंत सकलविद्या पारंगत होऊन उपनयनसंस्कारहीझाला गुरु-कुलवासत्रास न होतां २ वर्षातच सर्वशास्त्रांत निपुणझालेत. अष्टमवर्षलागतांच तुरीयाश्रमघेण्याच्या इच्छेनें मातोश्री-स प्रार्थना केली व आज्ञामागितली परंतु प्रापंचरीत्या या मुलास ग्रहस्थाश्रमह्वावा या हेतूनें मातोश्रीनें संन्यास घेण्या, ची आज्ञा दिली नाहीं तेह्मां प्रापंचिकदु:खांचे नानाप्रकारें विस्फोटणकरून सांगीतल्यावरही मातोश्रींनी आज्ञा दिली

नाहीं असें पाहून मात्राज्ञा व्हावी व दुर्वास ऋषी शापें करून मकरी चा जन्म प्राप्त झालेल्या हा हा नामकगंधर्वास ही मुक्त करावें अश्या उद्देशद्वयाने मातोश्रीसह चूर्णानदीस स्नानास गेलेत, पाण्यांत उतरतांच मकरीनें माझापांय धरलॉ असें मातोश्रीस ओरडून सांगीतलें। मातोश्री फार क्लेशितझाली असें पाहून पुन्हां मातोश्रीची प्रार्थना केली कीं आपणमला तुरीयाश्रमघेण्याची आज्ञा देत असलांतर मी वांचेन नाहीं- पेक्षां हीमकरी मला घेऊनजात आहे तेव्हां मातोश्रीनें हा अनावरसमय आहे असेंजाणून यांनां तुरीयाश्रमाची आज्ञा- दिली त्यामात्राज्ञानुसार आश्विनशु. १५ अश्विनीनक्षत्र अ- भिजित्मुहूर्तावर तुरीयाश्रमधारण करते झालेत ।

तदनंतर मातोश्रीस नमस्कार अर्थात् वंदन करून तुरी- याश्रमाच्या क्रमसंन्यासपद्धतीस अर्थात धर्मास आचरण केलं पाहिजे म्हणून कांहीं दिवसगुरुसेवाकरण्याची इच्छाप्रगट केली व जाण्याची आज्ञामागितली । पुत्राचें हें वचन ऐकितां- च मातेस फारदु:खझालें त्यावर पुढें होणाऱ्या वियोगदु:- खावरही तिचें (मातोश्रीचे) अनेक रीतीनें संबोधन केलें अर्थात समजूत दिली व ज्यावेळीं आपण माझें स्मरणकराल त्यावेळेस लागलीच हाजर होईन असें अभिवचन मातोश्रीस

दिलें व जाण्याची आज्ञा घेतली. तेथून निघून श्री नर्मदा तीरीं तप करणारे गोविंदभगवत्पाचार्य यांज जवळ जाऊन आत्मोद्देश प्रगट केला व त्यांज पासून सरस्वती सांप्रदाई महावाक्यांचा उपदेश घेऊन श्रीमच्छंकरभगवत्पादाचार्य असें नांवटेऊन घेतलें. कांहीं कालपर्यंत आत्मविचारकरीत गुरुजवळच वासकेला। त्यासमयीं नर्मदेचा मोठापूर येऊन जनास फार त्रास झाला तेहां ते लोक शरण आलेत त्यावर आचार्यांस करुणा येऊन तें सर्वपाणी एकामृतिका घटा मध्यें आपल्या तप सामार्थ्याने भरून जनांस त्या त्रासापासून सोडवलें तेथून गुरु आज्ञा घेऊन श्रीवाराणसीमहाक्षेत्रास जाते झाले तेथें श्रीकाशीविश्वेश्वरांनीं चांडालवेषानें येऊन यांची परिक्षाघेतली व प्रसन्न होऊन आपलें निजरूपाचें दर्शनदिलें व सांगितलें कीं आपणभाष्यत्रयांचीरचना करावी त्याप्रमाणें आचार्यांनी प्रस्थानभाष्यत्रयग्रंथांची रचना केली आणि पुष्कळशे वेदांपर, भक्तिपरग्रंथहीलोकांच्याकल्याणार्थ करितेझाले व दक्षिणदेशांतून आलेल्या सनंदन नामक ब्राह्मणास आश्रम देऊन आपला शिष्य केला. एकेदिवशीं असा चमत्कार झालाकीं हासनंदन शिष्य गंगेच्यादुसरी कडेहोता इतक्यांत आचार्यानें त्यासबोलविलें हीवाणी आप

त्यागुरूचीच आहे असें जाणून लागलीच त्याने गंगेंत उडी घातली हें पांहून हाखरा गुरु आज्ञा पालक आहे असेंसमजून गंगेने यास एक कमलपुष्प दिलें, त्यापुष्पा धारानें गंगेचा प्रवाह ओलांहून गुरूजवळयेऊन उभारा-हिला । या अलौकिक चमत्कारासपाहूनच आचार्यानें याचें (सनंदनाचें) पद्मपादाचार्य असें नांवठेविलें । त्या-नंतर कैलासमार्गांत सप्तकोटीमहामंत्रांची उपासनाकरून त्यांप्रसिद्धकरून घेतलें व त्यांच्यासहायतें करून गगनमार्गानें कैलासास जाऊन प्रविष्ट झालेत् । गणांनीयुक्त श्रीपार्वती-देवी ज्याच्यावामांकावरबसली आहे अश्या श्रीशंकरास पाहून वंदन करून स्तुती करतेझालेत । यास्तोत्रास ऐकतां च श्रीपरमेश्वर प्रसन्नझालेत (मदंशतस्त्वं जातोसी) माझ्या च अंशापासून तूं उत्पन्नझालास अर्थात्त शंकराचार्य हा-माझाच अंश आहे काही भिन्नतानांही असेम्हणून परमे-श्वराने आचार्यांस पांच स्फटिकलिंगें (योग लिंग, भोग लिंग, वरलिंग, मुक्तिलिंग, मोक्षलिंग) आणि सौन्दर्य-लहरीनामक मंत्रसारस्तुति देऊन यांवरपूर्ण अनुग्रहकेला कैलासाहून याभूलोकीं येते वेळीं मार्गांत नेपाळास येऊन प्राप्तझालेत । तेथें असणाऱ्या श्रीपशुपतेश्वराचे दर्शनही

घेतलें । वृषदेववर्मानामक राजाची भक्तिश्रद्धापाहून आनंदीत होत्साते त्यास उपदेश (अद्वैतोपदेश) करून आपला शिष्य केला । त्यास पुत्रसंतान नव्हतें, यांचा अनुग्रह झाल्या वर मुलगा झाला म्हणूनच राजानेमुलाचेनाव शंकर असें- ठेविलें नैपाळच्या राजाची भक्ति श्रद्धा अत्यंत आहे व पूर्ण- धर्माभिमानी आहे असें जाणून कैलासाहून आणलेल्या पांच स्फटिक लिंगांपैकी वरलिंगनामक चन्द्रमौलीश्वराची तेथें (नैपाळांत) स्थापना केली व त्याराजास (तुझें शत्रु- बाधारहित अखंडराज्य चालो) असा आशिर्वादही दिला तेथून निघून बद्रिकाश्रमीं आलेत तेथें नारायणमूर्तीचें दर्शनघेऊन जोतिष्मतीमठ निर्माणकरून त्यांत मुक्तिलिंग- नामक चन्द्रमौलीश्वराची स्थापना केली. त्याच ठिकाणी एक उष्णोदकाचें कुंड आहे तेंही यांनींच निर्माणकेलें या कुंडाचें पाणीं नेहमीं उष्णचरहातें ।

तेथून निघून संचार मार्गांत जनांस अद्वैतोपदेशही करीत करीत प्रयाग अर्थात् अलाहाबादेस येऊन प्राप्त झालेत तेथें गुरुनिंदादोषपरिहारार्थ साळीचे सालपट गोळाकरून व तें पेटवून आत्मप्रायश्चितार्थ निश्चयकरून बसलेला स्कंदा- वतार व कर्ममार्गस्थापक असाजो कुमारिलभट्टपादाचार्यांस

दर्शन दिले व तो अनुतप्तझाला असें जाणून तूं दोषमुक्त आहेस असें अभिवचन देतेझाले । त्याच्याच प्रार्थनेवर काश्मीर देशीं माहिष्मती नगरांत राहाणारा, ब्रम्हावतार, कर्ममार्गस्थापक असा जो पंडित मंडनमिश्रनावाचा ब्राम्हण होता त्यासही दर्शन दिलें ।

खालील प्रतिज्ञेनुरूप आचार्यांचें व मंडनमिश्राचे वादास प्रारंभ झाला ।

१. कर्ममार्गाचें खंडन झाल्यास मंडनमिश्राने संन्यासधारण करून आचार्यांचे शिष्य व्हावें ।

२. अद्वैताचें खंडनझाल्यास आचार्यांनी गृहस्थाश्रम घेऊन उक्त पंडितांचे शिष्य बनावे ।

वादांत आचार्यांची वर बाजू झाली अर्थात आचार्य जिंकलेत तेव्हां कबूलीप्रमाणे पंडितमंडनमिश्रास संन्यास देऊन आपला शिष्य बनविला त्याचें नांव सुरेश्वराचार्य असें ठेविलें । उक्त वादांत अपजय होऊन आपल्यापतीस संन्यास घ्यावें पडलें असें पाहून सरसवाणी मंडनमिश्राची स्त्री । (कि जी केवल सरस्वतीचांच अवतार होता) ब्रम्हलोकास (स्वर्गास) जाण्याकरितां निघाली असें अवलोकितांच आचा-

यांनी वनदुर्गाप्रयोगाने तिला अधर बंधन केलें व थांबवली आचार्यांच्या या प्रयोगावर तिला फार राग आला आणि आचार्यां समक्ष येऊन वादकरण्यास सिद्ध झाली तेव्हां आचार्यांने तिलाही वाग्बद्ध करून घेतलें ते येणे प्रमाणे: वादांत जो जिंकेल त्याने दुसऱ्यास आपला शिष्य करून ध्यावा या प्रतिज्ञेवर आचार्यांचा व सरसवाणीचा वाद चालला ।

आचार्यांनी सरसवाणीस ६३ कलांत जिंकिलें परंतु ६४ वी कामशास्त्रसंबंधी जी कला त्यांत यांना अगदींच माहीती नव्हती— (माहिती नसल्याचे कारणकी) ब्रह्म-चर्याश्रमांतूनच तुरीयाश्रमातगेलेत ह्मणून यांना गृहस्था-श्रमाचा कांहींच अनुभवनव्हतासबब त्यासंबंधाने कांहीं बोलूंशकलेनाहीं— तथापि केवळ ईश्वरांशच असल्याका-रणानी सरसवाणीपासून ६ महिण्यांची मुदत घेतली व परकायाप्रवेशिनी विद्येने कामशास्त्राचाही अनुभव घेऊन त्यांत ही प्रवीण झालेत आणि सरसवाणीस जिंकिलें तेव्हां उक्त ह्मणजे वर सांगितल्या प्रतिज्ञेनुरूप सरसवाणीस आप-ली दासी केली । हा केवळ सरस्वतीचा अवतार आहे असें जाणून तिला आपल्या मार्गे येण्यास सांगितलें ।

मार्गांत एका कापालिकमताभिमानीनें आचार्यास मस्तक मागीतलें, आचार्यमस्तकदेण्यास सिद्धझालेत, इतक्यांत त्यांचे शिष्यां पैकीं पद्मपादनावाचे शिष्यास ज्ञानदृष्टीनें हा कपट प्रसंग माहीत होतांच नरसिंहरूपधारणकरून पद्मपादत्या-ठिकाणीं आले व त्याकापालिकास उभा चिरून टाकिला ।

तेथून निघून गोकर्णक्षेत्रीं येऊन प्राप्तझालेत तेथें एका-मृतक मुलासपाहून त्यास जिवंतकेलें पुढें श्रीवल्ली अग्रहारांत एकमूकबालक दर्शनापेक्षेनें आचार्या समक्ष येतांच त्याचें मूकत्व जाऊन वेदांतकथनकरताझाला त्याचमुलास आश्रम देऊन आपला शिष्य केला व त्याचें नांव हस्तामलक असें ठेविलें ।

तेथून निघून जागजागीं दुर्मतांची खंडना व अद्वैत-स्थापनाकरीत करीत विभंडकतपोवनांत तुंगभद्रातीरी' शृंगगिरीस येऊनपोहोंचलेत । सरस्वतीचें कांहीं अंश तेथें ठेऊन (अर्थात कांहीकला तेथें स्थापनकरून) सरस्वतीस ब्रम्हलोकाप्रत जाण्याची आज्ञादिली । आणि पद्म-पादाचार्यास रामेश्वरीं जा असें सांगितलें । मार्गांत पंचपादिकानामीपुस्तक अग्नींतपडून जळूनगेलें तेव्हां पद्म-पादाचार्य पुढें न जातां परत शृंगगिरीस आलेत आणि

त्यांनी हीगोष्ट आचार्यास सांगितली । पूर्वी आचार्यानें हें पुस्तक एकवेळ साद्यंत श्रवणकेलेहोतें त्याप्रमाणें नवीप्रती-तयारकेली जी आजतागाईतप्रसिद्धींत आहे ।

इकडे मातोश्रीने आपला काळ समीप आला असें जाणून यांची आठवण केली । तत्क्षणीं तेथें जाऊन तिची इच्छा पूर्ण करतेझाले म्हणजे मातोश्रीमरणपावली असें पाहून पुढीलकृत्यास आरंभकरावा अशा विचारांत पूर्वाश्रमचे गोत्रजांस त्या कार्यांत तुम्ही सहायता द्यावी असे-म्हटलें परंतु मातुलपक्षाखेरीज इतर गोत्रजांनी सहायता-करणे सोडून उलट यांचा उपमर्द केला कीं अठवर्षाच्या वयाच्यामुलास संन्यास घेणें अयोग्य व अशास्त्र आहे सबब तुम्हीं पतित आहां त्यावर आचार्यानें उत्तर दिलेकीं वैराग्यास वयाची गरज नाहीं, या उत्तरावरही त्यांचादुराग्रहच आहे असें जाणून आचार्यास अती क्रोध आला आणि शाप-देते झालेकीं आजमितीपासोन या गांवच्यालोकांनी शवास आपापल्या सरहद्दीतच दहन करितजावें व समूह वस्ती करून ये म्हणजे दूरदूरघरबांधून रहावें या आज्ञेचा-भंगकेल्यासमूळनाशहोईल । आचार्याची ही क्रोधयुक्त वाणी श्रवणकरतांच मातुलपक्षियजनसर्व येऊन आचार्यास

अति नम्रतेने शरण आलेत आणि अपराधाचीक्षमामांगितली। तदनन्तर आचार्यांनी मातोश्रीचे मृतकशरीरास म्हणजे शवास खंडखंड करून जाळूनटाकिलें। आजपासून कोणी संन्यासी या कालटी ग्रामास येऊन ये असे बोलन तेथून निघूनगेलेत। श्रृंगगिरीस येऊन तेथें एकमठबांधवून त्या मठांत भोगलिंगनामक चन्द्रमौळीश्वरची स्थापनाकेली। त्यादेवाच्या पूजे करितां व आसमंतात् असणाऱ्याशिष्यवर्गास अद्वैतोपदेश करीत असण्यासमृत्युअंशपृथ्वीधवाचार्यनामक आपल्या एका शिष्यास तथील मठाधिपति केला। नंतर तेथून निघून मार्गांत जनास अद्वैतोपदेश करीत करीत द्वारकेस येऊन दाखलझालेत तेथेंही कालिका नामक पीठ स्थापीलें, व पद्मपादाचार्यांस त्यामठाचे अधिपतीकेलें। पुढें मार्गांत अद्वैतोपदेश करीत करीत जागजागीं असणाऱ्या उग्रदेवतांचे तेज शांतकरीत श्रीजगन्नाथपुरीस आलेत तेथेंही गोवर्धन नावाचें मठ बांधवून त्यांत विमलादेवीची स्थापना केली व पूजे करितां हस्तामलक आपल्या शिष्यास तथील मठाधीश केला। तेथून मद्रासेस आलेत तेथील चंडी नामक देवीचें उग्रतेज आकर्षण करून तिलाशांत केली पुढें मार्गांत अद्वैतोपदेश करीत क्रमानें चिदंबरक्षेत्रीं प्राप्तझालेत तेथें

श्रीनटराजाचे मंदिरांत मोक्षलिंगाची स्थापना करून आकाश यंत्राचा उद्धारकेला तेथील व्यवस्था गावांत राहणाऱ्या तीनहजारविद्वन्ब्रम्हमंडळीचे स्वाधीन करून आपण तिरुपती अर्थात शेषाचलपर्वतीं आलेत । तेथें श्रीसुब्रह्मण्य आणी व्यंकटेश्वर यांच्या मध्यभागीं धनाकर्षण यंत्राचा उद्धार करून आपण रामेश्वरास येते झालेत, तेथें सेतुस्नान व श्रीरामेश्वराचे दर्शन घेऊन कन्याकुमारीस आलेत तेथील प्रचलित वीर वैष्णवमत्ताचें खंडन करून अद्वैताची स्थापना केली आणि तेथून निघून मार्गांत जागजागीं धर्मोपदेशकरित क्रमाने जंबुकेश्वरीं येऊन प्राप्तझालेत । तेथें अखिलांडेश्वरीचे दर्शन घेतलें त्यामूर्तीचें तें उग्रतेज अवलोकन करतांच आचार्यांच्या मनांत आलें कीं या उग्रतेस शांत केल्याने लोकांचे कल्याणहोईल असें जाणून श्रीगजाननासदेवी समोर केलें । विघ्नेश्वरावर दृष्टी पडतांच देवीने पुत्रवात्सल्याने अधो दृष्टी केली ती अधो दृष्टी तशीच रहावी म्हणून देवीच्या कानांत असणाऱ्या कर्णफूलांत श्रीचक्रांचा उद्धारकेला । अश्यारीतीनेत्यादेवीचें उग्रतेज शांत केलें.। आचार्यांच्या या अलौकिकपराक्रमास पाहून (त्रिशिरपुर) (त्रिचिनापल्लीचा) राजा फार प्रसन्नहोऊन यांचाफारगौरव

करिताझाला व तेथें याना एकमठही तयारकरून दिलें त्या खर्चा करितां काहीगांवहीदिलेत जे आजपर्यंत चालत आहेत तेथून पुढें सत्यव्रत प्रलयजित असें जे कांचीक्षेत्र त्याप्रत येते झालेत तेथें रुद्रकोटी (एकाम्रेश्वर) पुण्यकोटी (वरदराजस्थान) यादोनी स्थानांच्या मध्य भागी कामकोटी या नावाने सुप्रसिद्ध स्थल आहे त्याच्या काम कोष्ठ धरातल या नावाच्या गुहा द्वारांत पद्मासनारूढ झालेली अशी कामाक्षी या नावाने प्रसिद्ध असणारी जी त्रिपुरसुंदरी तिचें दर्शन घेऊन त्याचमार्गानें पुढें गुहेंत प्रवेश करणार तोंच त्या स्थलीं, ह्मणजे त्या द्वारांतच असणारी सरस्वती जिनें, "मला सरसवाणीच्या अवतारांत जिंकलें होतें तेहच आहेत' असें आणून यांसमार्गदिला" आचार्य जसे गुहद्वारानें आंतझालेत (गेलेत) तेह्वां हें केवळ विराटरूपी पराशक्तीचें मर्मस्थान आहे असें जाणून त्या स्वर्णमेरूला प्रदक्षिणाकार (आवर्णदेवतांसहित) त्यांची स्तुती करून त्यांनाप्रसन्न केलें त्याणि तेथील उग्रतेला आकर्षणकरून अर्थात ओढून घेऊन गुहेबाहेर आलेत गुहेच्या बहिर्भागीं देवीसन्मुख स्वर्णमेरूसमान (स्वर्णमेरूच्याबरोबरीनें) तेथिल उग्रता शांत्यर्थ मंत्रशास्त्रांत सांगितल्यप्रमाणें भूप्रस्तार रीतीनें गंडक

शिलेवर श्रीचक्रोद्धार करते झाले आणि कैलासाहून, आणलेल्या सौंदर्यलहरी, नामक मंत्र शास्त्रानुसार जगदंबेची स्तुती करून १६ कलां पैकीं कांहीं कला तेथेंच ठेऊन उरलेल्या कला मेरु प्रस्तार रीतीनें आत्मपूजनार्थ, बरोबर घेतेझाले त्या पूर्वी या देवीची पूजा तांत्रिक रीत्या केलीजातहोती, ती, बंदकरून या पुढें वैदिकमार्गाने ही पूजा चालावी अशी आज्ञा दिली जी आज मिती पर्यंत चालत आहे । अशा समयी आचार्यांचें हें अमानुषी कृत्यपाहून (पराक्रमपाहून) अत्यानंदितहोतसाते त्यांवर अनुग्रहकरावा यो हेतूनें श्री दत्तात्रेय महामुनीही त्यास्थलीं प्राप्त होऊन आचार्यास आशिर्वाद देत झाले कीं पाषंडमत खंडनकरणार । अद्वैतमत स्थापन करणारे । सरसवाणीच्या रूपांत असलेल्या सरस्वतीस वादांत जिंकून आपली यशः कीर्ती वाढविणारे, असे जे आपण आहांत त्यांचा आचंदार्क या मेदिनीवर धर्माधिकार चालत राहावा आणि श्रीमज्जगद्गुरू या नांवानें चिरकाळ प्रसिद्धी होत असावी । असा श्री दत्तात्रेयमहामुनीचा अनुग्रह श्रवण करतांच आचार्यांनी त्या देवी सन्निध असलेल्या सर्वज्ञ पीठावर आरूढहोण्याचा विचार करून त्या पीठासंन्निध गेलेत इतक्यांत आका-

शवाणी झाली की या पृथ्वीवरच्यां सर्व विद्वानांला जिंकून नंतर आपण या पीठावर आरूढ व्हावें अशी ही सरस्वती-ची आकाशवाणी ऐकून आचार्य कांही कालपर्यंत विचार करीत स्तब्ध उभेराहिलेत, तोंच ताम्रपर्णीतीरस्थ भेदमतस्थां-चा एक समूह त्या स्थलीं येऊन पोहोंचला त्या लोकांनाही वादांत जिंकून त्यानांही अद्वैत मतस्थ करून घेतलें पश्चात् पीठारोहण सभारंभास आरंभझाला, दत्तात्रेयादि महामुनि, इतर ऋषी मंडली, विद्वन्ब्रह्ममंडली, चोळदेशाधिपति राज-सेन महाराज, आचार्यांच्या या अमानुषी कृत्याला पाहून अत्यानंदित होत्साते त्यांच्या सन्मानार्थ आंदोलिक श्वेतछत्र स्वर्णचामर, नवरत्नघट, रत्नजडितपादुका इत्यादि माननीय बिरदावली श्री आचार्यांस अर्पण करून अत्यानंदितहोत्साते करद्वयजोडून आपल्या मंत्री सरदारां सहित आचार्यांच्या सन्मुख उभे राहिले । हस्तामलक, पद्मपाद, त्रोटकार्यादि शिष्यमंडली, छत्र, चामर, मकर तोरण मयूरपुच्छ, स्वर्ण-वेत्रदंड वगैरे आयुधें हातांतधारणकरून, कोणी स्वर्णदीप, कोणी ताडाचेपंख, कोणी पटुपट्—भेरी, काहळ, झांकाळ, कटक, वीणा, वेणू, मृदंग इत्यादि वाद्यें वाजवीत कोणी आचार्यांच्या या अमानुषी कृत्याची, मोठ्या घोषानें स्तुती

करीत आहेत । अशया आनंदित समयीं आचार्य मर्यादार्थ (गौरवार्थ) आपले शिष्य पद्मपादाचार्य यांचा हस्त धरून पीठारूढ झालेत त्यासमयीं त्यास्थलीं हाजर असणारी सर्व शिष्यमंडली प्रसन्नचित्तानें खालील स्तुती करतेझाले ।

जय गोविंदभगवत्पादपादाब्जषट्पद
जय जीवपराभेदवावदूक जगद्गुरो ।
जय भो बौद्धपाषंडविध्वंसनविचक्षण
जय वेदांतसिद्धांतसिद्धांजन महामते ॥ १ ॥

कांचीपुराभरण कामद कामकोटी-
पीठाभिषिक्त वरदेशिक सार्वभौम ।
सार्वज्ञ शक्त्यधिगताखिलमंत्रतंत्र-
चक्रप्रतिष्ठित विजृंभितचातुरीक ॥ २ ॥

अशी मोठ्या घोषानें स्तुती करून आचार्यास साष्टांग प्राणीपात करते झाले स्वर्गवासी देवानीं ही या सभारंभास पाहून अत्यानंदित होत्साते पुष्पवृष्टी केली । दुंदुभी वाद्यांचा घोष केला अप्सरांनी नृत्य गायन हीं केलें या उत्साह समारंभास अवलोकनकरून अत्यानन्दानें श्रीदत्तात्रेय महा-

मुनी आचार्यास आशीर्वाद देऊन आपल्या गुहेप्रत गमन करते झाले नंतर तेथील राजा राजसेन महाराज यानें आचार्यांच्या आज्ञेनुरूप त्याजागीं एक नवीन ग्राम वसविण्याची योजना केली रुद्रकोटी, कामकोटी, पुण्यकोटी, या तीनी स्थलांतील देवालयें सात गोपुरांसकट बांधवावीं व प्रत्येकीं गांव वसवावें आणि कामकोटींत आचार्यांच्या राहण्याकरितां एक नवीनमठ करून द्यावे असा हुकुम सोडला त्याप्रमाणें वरील सर्व कामें तयार होऊन आचार्यांच्या स्वाधीनकेली व आपण स्वत: आचार्यांच्या आज्ञेनुरूप वागून इतर जनासही तोच उपदेश करीत असे । तद्नंतर आचार्यानें आपले मुख्य शिष्य सुरेश्वराचार्य यांस सांगितलें कीं तुम्हीं शृंगगिरीस जाऊन तेथें व्याख्यान सिंहासनपीठ स्थापितकरा माझे केलेले सूत्र भाष्य व्याख्यान रूपानें वर्णन करून शिष्य मंडळीस अद्वैतोपदेश करीत रहा या आज्ञेवर सुरेश्वराचार्य शृंगगिरीस गेलेत व तेथें एक तप राहून गुरु आज्ञानुसार तेथील सर्व कामें करून परत कामकोटी पीठास गुरु सन्निधानी येऊन प्राप्त झालेत ।

समाधिकाल निकट आला असें जाणून या ३२ वर्षा-

च्या अल्प अवधींत षण्मतस्थापन, अद्वैतस्थापन इत्यादि महत्कार्य जे आपण केलेत ते आचंद्रार्क या मेदिनी वर चालू रहावेत अश्या उद्देशानें आपल्या स्वस्थानांत (म्हणजे कामकोटी पीठांत) व इतर पीठांतही ब्रंम्हचारी च पीठाधीश झाला पाहिजे अशी आज्ञा देऊन ताम्रपर्णीतीरस्थ आठ वर्षांच्या वयाचा ब्राम्हणाचा एक मुलगा (ज्यानें एकसारखें तीन दिवस अखंड वाद, आचार्यांशी ते संचारांत असतांना घेतला होता) त्या बालाकाची अप्रतिम बुद्धी, वादकरण्याचें साहस पाहून हा सर्वज्ञ आहे असें समजून पित्यापासून त्यास मागूनघेतलें आणि आपल्या बरोबर ठेविलें होतें त्याचमुलास आतां आश्रमदेऊन पीठाधिपती केलें व त्याचें नांव सर्वज्ञात्मश्रीचरणेंद्रसरस्वती असें ठेविलें परंतु हा अति वयसान आहे असें जाणून आपले मुख्य शिष्य सुरेश्वराचार्य कि जे ग्रहस्ताश्रमांतून संन्यस्त झाले होते त्यांस पीठाचे व्यवस्थापक केलें आणि जोंपर्यंतसर्वज्ञात्मश्रीचरणेंद्रसरस्वती लहान आहे तों परियंत त्यानें (सर्वज्ञात्म श्रीचरणेंद्रसरस्वतीनें) सुरेश्वराचार्य यांना आपले मोठे समजून त्यांच्या आज्ञेनुसार वर्तन करीत असावें। आचार्यांनीं आत्मपूजार्थ ठेऊन घेतलेलें जें योगनामक चंद्र-

मौलीश्वरलिङ्ग तें देखील सुरेश्वराचार्यांच्याच हातानें सर्वज्ञात्मश्रीचरणेंद्रसरस्वतीस दिलें।

या कामकोटी पीठस्थांसच श्रीमज्जगद्गुरुशंकराचार्य असे म्हणावें व इतर पीठस्थांस श्रीगुरुशंकराचार्य असें म्हणतजावें।

पीठांची नांवे येणे प्रमाणें।

(१)	कांची	...	कामकोटीपीठ
(२)	शृंगगिरी	....	शारदापीठ
(३)	द्वारका	...	कालिकापीठ
(४)	बदरीनारायण	....	पूर्णगिरीपीठ
(५)	जगन्नाथ	...	विमलापीठ

हे पांच पीठ स्थापून त्यांचे सांप्रदाय खालील प्रमाणें—

(१)	कांची	...	कामकोटीपीठ
	आम्नाय	...	मौलाम्नाय
	मठ	...	शारदामठ
	क्षेत्रस्यनाम	...	सत्यव्रतकांची
	तीर्थस्यनाम	...	कंपासर

देव	...	एकाम्रनाथ
शक्ति	...	कामकोटी
वेद	...	ऋग्वेद
सांप्रदाय	...	मिथ्यावार
आश्रमनाम	...	इंद्रसरस्वती
ब्रंम्हचर्य	...	सत्यब्रंम्हचारी
महावाक्य	....	ॐतत्सत्

इति कामकोटी पीठस्य सांप्रदाय ।

(२)	शृंगगिरी	...	शारदापीठ
	आम्नाय	....	दक्षिणाम्नाय
	पीठ	....	शारदापीठ
	क्षेत्र	....	रामक्षेत्र
	सांप्रदाय	....	भूरिवार
	संन्यासनाम	....	भारती
	देवता	....	वराह
	शक्ति	...	शारदा
	आचार्य	....	पृथ्वीधरः
	तीर्थ	...	तुंगभद्रा
	ब्रंम्हचर्य	....	चैतन्यब्रंम्हचारी

वेद	....	कृष्णयजुर्वेद
महावाक्य	....	अहंब्रंम्हास्मि

इति शृंगगिरीपीठस्य सांप्रदाय ।

(३) बदरीनारायण

मठ	...	ज्योतिर्मठ
पीठ	...	ज्योतिष्मती
क्षेत्र	...	बदरिकाश्रम
तीर्थ	...	अलकनंदा
देव	...	नारायण
शक्ति	...	पूर्णगिरि
वेद	....	अथर्वणवेद
संप्रदाय	...	आनंदवार
संन्यासनाम	....	गिरी
ब्रंम्हचर्य	...	आनंदब्रंम्हचारी
महावाक्य	...	अयमात्माब्रंम्ह
आचार्य	...	तोटकाचार्य अर्थात् आनंदगिरी (शंकरविजयकर्ता)
आम्नाय	....	उत्तराम्नाय

इति ज्योतिर्मठस्य सांप्रदाय ।

(४) द्वारका ....

मठ	....	द्वारका
आम्नाय	....	पश्चिमाम्नाय
पीठ	....	कालिका
क्षेत्र	....	द्वारावती
तीर्थ	...	गोमती
देव	....	सिद्धेश्वर
शक्ति	...	भद्रकाली
वेद	....	सामवेद
संप्रदाय	...	कीटवार
संन्यासनाम	....	आश्रमी
ब्रंम्हचर्य	....	सुरूपब्रंम्हचारी
महावाक्य	—	तत्त्वमसि
आचार्य	—	पद्मपाद

इति द्वारकामठस्यसांप्रदाय ।

(५) जगन्नाथ

मठ	...	जगन्नाथ
आम्नाय	...	पूर्वाम्नाय

पीठ	...	विमलापीठ
देव	...	पुरुषोत्तम
तीर्थ	...	महोदधी
क्षेत्र	...	जगन्नाथ
शक्ति	...	विमलादेवी
वेद	...	शुक्लयजुर्वेद
सांप्रदाय	...	भोगवार
संन्यासनाम	...	अरण्य
ब्रंम्हचर्य	...	प्रकाशब्रंम्हचारी
महावाक्य	—	प्रज्ञानंब्रंम्ह
आचार्य	—	हस्तामलक

या प्रमाणें पांच मठांचे सांप्रदाय त्यांची मर्यादा उपदेश करण्याची रीती अपआपली हद्द या सर्व गोष्टींची त्या त्या मठाधीशांस समजूत देऊन आपसांत कोणत्याही प्रकारें कलह न होतां आप आपले काम या आज्ञे प्रमाणेंच करीत रहावें या हेतुने मठाम्नायसेतु या नांवाचा एक ग्रंथ ही केला— वैदिक व लौकिक कामांत आपआपल्या शिष्यमंडळीस श्रीमुखपत्रें पाठिवण्याचीपद्धती येणे प्रमाणे :—

कामकोटीपीठस्थांचीपद्धती—

कामकोटीपीठाची बिरदावली लिहिण्याची पद्धती:— परमहंसपरिव्राजकाचार्यवर्य जगद्गुरु श्रीमच्छंकरभगवत्पादाचार्याणां अधिष्ठाने इत्यादि ।

वरकड चार मठाधीशांना त्यांच्या मुद्रा देऊन आपापल्या स्थानीं जाण्यास आज्ञा दिली आणि आपण कामाक्षीचे पश्चिम भागीं या स्थूलशरीराचा त्याग करून सूक्ष्म शरीरास धारणकरून निर्विकल्प समाधींत आज मिती पर्यंत प्रकाशमान होत आहेत म्हणजे कलिवर्ष २६२५ बी. सी. ४७६ तथा रक्ताक्षीनामसंवत्सर वैशाखशु ॥ ११ रोजीं शंकरभगवत्पादाचार्य श्री कांची क्षेत्रीं समाधिस्थ झालेत् त्या समाधीची त्रिकालपूजा दीपाराधन नैवेद्य, पक्षोत्सव, मासोत्सव, अवतारोत्सव, व्यासपूजामहोत्सव, विश्वरूपयात्रामहोत्सव इत्यादि उत्सवांच्या खर्चानिमित्त

चोळमंडलाधिपती राजसेनमहाराजानें कांहीं गांव ही दिलेत जे आज तागाईत चालत आहेत सरकारगवर्नमेंटही या खर्चाबद्दल कांही नगदी वर्षासन देत असतात ।

(२) दुसरे आचार्य सुरेश्वराचार्य जाति— मिश्र ब्रांम्हण म्हणजे कान्यकुब्जब्रांम्हण । यांची जन्मभूमि काश्मीर पूर्वाश्रमचेंनांव मंडनमिश्र यांचे केलेलेग्रंथ तैतिरीय बृहदारण्य वार्तिक, नैष्कर्म्यसिद्धि, मानसोल्लास, पंचीकरणा, अनेक वार्तिकादि ग्रंथ यांनी केलेत जे आजपरियंत प्रचलित आहेत हे कलिवर्ष २६२५पासून कलिवर्ष २६९५ परियंत म्हणजे ७० वर्ष या कामकोटीपीठावर व्यवस्थापक या नात्याने अधिकार चालवून व इतर चार पीठावर गुरुत्वाचा अधिकार चालवून कलिवर्ष २६९५ बीसी ४०६ भवनामसंत्सर ज्येष्ठमास १२ दिवशीं श्रीक्षेत्रकांची येथें समाधिस्थझालेत चोळमंडलाधिपति राजसेन महाराजाने यांची समाधी आदिआचार्यांच्या समाधीचे बाजूसच बनविली आहे । यांनी पूर्वाश्रमीं असतानां कांचीक्षेत्रांत कांहीं घरें बांधवून बांम्हणांस दान दिलींत तीं मंडनमिश्रअग्रहार या नांवानें आजपरियंत कायम आहेत ।

(३) तिसरे पीठस्थ— सर्वज्ञात्मश्रीचरणेंद्रसरस्वती

यांची जन्मभूमि— पांड्यदेशांत ताम्रपर्णीतीरीं जाति—द्राविडब्रांम्हण— पूर्वाश्रमनाम— महादेव यांनी सर्वज्ञविलास संक्षेपशारीरक इत्यादि ग्रंथद्वारा सर्वत्र अद्वैताची वृद्धी केली । द्वारकामठाधिपति ब्रम्हस्वरूपाश्रम यांस भाष्य शिकविलें आर्हत मताचे खंडन केलें । यांनीं ८ वर्षांच्या वयांत पूर्वाश्रमीं असतांनाच आपले गुरू श्रीशंकरभगवत्पादाचार्यांशीं तीन दिवसापरियंत अखंडवाद घेतला त्यानें अर्थात् त्यावादानें आचार्यांस फार संतोष झाला हामुलगा सर्वज्ञ आहे असें समजून त्याला त्याच्या पित्याशीं मागून घेतलें व आश्रमदेऊन आपला शिष्यबनविला त्याचें नांव सर्वज्ञात्मश्रीचरणेंद्रसरस्वतीठेविलें— यांचें सगळें आयुष्य १२० वर्षें पैकीं ८ वर्षें पूर्वाश्रमांतगेलीं— आश्रम घेऊन विद्यागुरु सुरेश्वराचार्य यांचे अधिकाराखालीं ७० वर्षें पीठस्थ राहिलेनंतर ४२ वर्षें स्वतंत्राधिकाराचा उपभोग घेऊन कलिवर्ष २७३७ बी. सी. ३६४ तथा नलनामसंवत्सर वैशाख वद्य १४ रात्रौ कांचीक्षेत्रांतच समाधिस्थ झालेत । यांची समाधी देखील तेथें अद्यापकायम आहे ।

(४) चवथेपीठस्थ— सत्यबोधेंद्रसरस्वती—यांची जन्मभूमि चेरदेशांत आम्रावती नदी तीरावर— द्राविडब्रांम्हण—

यांचें पूर्वाश्रमनाम फलिनीष: । यांनी केलेले ग्रंथ– पद्क-शतकं नावाचे ग्रंथ यांनीं संचार करून अद्वैतमताचे दृढी-करणकेलें । तोतातिकमत म्हणजे बौद्धमत आर्हत जिन गुरू, कणभुक् आदिदुर्मतांचें खंडन करून अद्वैतास दृढ केलें । कलिवर्ष २७३७ पासोन कलिवर्ष २८३३ परियंत म्हणजे ९६ वर्षे अधिकार केला । बी. सी. २६८ तथा नंदननाम संवत्सर कार्तिक वद्य ८ माध्यान्ह कालीं श्री-कांचींसच समाधी घेतली ।

(५) पांचवेपीठस्थ– ज्ञानानंदेंद्रसरस्वती । यांची ज-न्मभूमी– चोळदेश मंगलगांवी द्राविडब्रांम्हण हे तर्क शा-स्त्रांत निष्णांत होते यांनी चंद्रिका नामक ग्रंथही तयार केला । हे कलिवर्ष २८३३ पासून २८९६ कलिवर्ष परिं-यंत म्हणजे ६३ वर्षें या पीठावर अधिकार चालवून बी. सी. २०५ मन्मथनाम संवत्सर मार्गशीर्ष शु. ७ रोजीं कांचीक्षेत्रांतच समाधिस्थ झालेत । यांची समाधी कायम आहे ।

(६) सहावेपीठस्थ आश्रमनाम शुद्धानंदमुनींद्रसरस्वती जन्मभूमि चोळदेशांत वेदारण्यनामकगावांत द्राविड ब्रांम्हण पूर्वाश्रम नांव विश्वनाथ । बापाचेंनांव वैद्यभुर्व त्यांनीं सौ.

गत नामी पाषंडमताचें खंडन केलें कलिवर्ष २८९६ पासून कलिवर्ष २९७७ परियंत म्हणजे ८१ वर्षें या आचार्यांनीं अधिकार चालवून बी.सी. १२४ तथा नल-नामसंवत्सर ज्येष्ठशु ६ ला कांचींतच समाधी घेतली ।

(७) सप्तमपीठस्थ भगवदानंदज्ञानेंद्रसरस्वती जन्म-भूमि चेरदेश बापाचेंनांव सूर्यनारायण पूर्वाश्रमनांव अन्नैया जाति आंध्र ब्राह्मण हे श्रीविद्या उपासक होते जगदंबेच्या साह्याने साहित्य विद्येंत पूर्ण होते झाले शंकरभाष्यावर यांनीं व्याख्यान लिहिलें त्याचें नांव वृती आहे यांनीं सुरेश्वराचार्यांनीं केलेल्यावार्तिकांवरही व्याख्या केली आहे कलिवर्ष २९७७ पासून कलिवर्ष ३०४६ परियंत म्हणजे ६९ वर्षे यांनीं या पीठावर अधिकार चालवून बीसी ५५ तथा क्रोधन नामसंवत्सर वैशाखवद्य ९ रोजी सायं काळीं श्रीशैल्यीं समाधि घेतली ।

(८) आठवे पीठस्थ कैवल्यानंदयोगींद्रसरस्वती यांचे दुसरें नांव सच्चिदानन्दसरस्वती जन्मभूमी श्रीशैल्यांत बापाचेंनांव शिवैया पूर्वाश्रमनाम मंगन्ना हे शिवराज-नामक योगांत नेहमीं निमग्नरहात होते कलिवर्ष ३०४६ पासून ३१२९ अर्थात ८३ वर्षें पीठाधिकार चालवून ई.

स. २८ सर्वधारीनामसंवत्सर मकरसंक्रांतीचेदिवशीं पुण्यरसा अर्थातकांचीक्षेत्रीं समाधिस्थ झालेत ।

(९) नववेंपीठस्थ— कृपाशंकरेन्द्रसरस्वती जन्मभूमि आंध्रदेशांत बापाचेंनांव सोमयाजी पूर्वाश्रमनाम—— गंगानाथगर्गगोत्र यांनीं दुर्मतांची खंडनाकरून षण्मतस्थापिलेत आणि अद्वैताचीवृद्धी केली तांत्रिक पूजा बंदकरून वैदिकरीतीनें पूजाकरण्याची पद्धती घातली आपलेगुरू कैवल्यानंदयोगींद्रसरस्वतीयांच्या आज्ञे प्रमाणेश्रृंगगिरींत सुभटविश्वरूप भारतीस तेथीलमठाधीश नेमिलाकलिवर्ष ३१२९ पासून ३१७० पर्यंतम्हणजे ४१ वर्षे अधिकारचालवून ई. स. ६९ विभवनामसंवत्सर कार्तिकव ॥ ३ला विंध्यपर्वताजवळ समाधिस्थ झालेत ।

(१०) दहावेंपीठस्थ- महेश्वरानंदसुरेंद्रसरस्वती। जन्मभूमी महाबळेश्वर कोंकणस्थब्राम्हण पूर्वाश्रम नाम महेश्वर हेपूर्ण योगी होते कलिवर्ष ३१७० पासून ३२२८ पर्यंत म्हणजे ५८ वर्षे अधिकारचालवून ई. स. १२७ तथा अक्षयनाम संवत्सर आषाढ शु. १४ दिवशीं कांची क्षेत्रीं, समाधिस्थझालेत ।

(११) अकरावे पीठस्थ—शिवानंदचिद्घनेंद्रसरस्वती ।

जन्मभूमी कर्नाटकांत । जाति कर्नाटकब्रांम्हण । पूर्वाश्रम नाम ईश्वर निस्सीम शिवभक्त होते कलिवर्ष १२२८ पासून १२७३ म्हणजे ४५ वर्ष अधिकार चालवून ई. स. १७२ विरोधकृन्नाम संवत्सर ज्येष्ठ शु. १० रोजीं या आचार्यांनी वृषाचलीं समाधी घेतली ।

(१२) बारावेपीठस्थ—- चंद्रशेखरेंद्रसरस्वती जन्मभूमी चोळदेशांत क्षीरनदीच्यातीरावर द्राविडब्रांम्हण यांचे पूर्वाश्रमनाम हरी हेनेहमीं सार्वभौममहाव्रतांत निमग्न रहात होते यांनी कलिवर्ष १२७३ पासून १३३६ पर्यंत म्हणजे ६३ वर्षें अधिकार चालविला हे नेहमी संचार करीत असत जेह्वां तिरुपतीस येऊन पोंहोचले तेह्वां तेंस्थलरमणीय व सुंदरपाहून निरंतर येथेंच रहावें असा निश्चय करून हे सच्चिद्घनेंद्रसरस्वतीस आपल्या पीठावर स्थापिलें व आपण श्रीवेंकटेश्वर मंदिरांत प्रदक्षिणा करतां करतां ई. स. २३५ आनंदसंवत्सर वैशाखशु ॥ ९ला अदृश्य झालेत ।

(१३) तेरावेंपीठस्थ— सच्चिद्घनेंद्रसरस्वती जन्मभूमी चोळदेशांत गरुडनदीच्यातीरीं जातिद्राविडब्रांम्हण बापाचें नांव श्रीधरपंडित पूर्वाश्रम नाम शेषाचल यांनीं यापीठावर ३७ वर्षें अधिकार चालवला त्यांतून ५ वर्षें गुरूच्या अधि

काराखालीं शिष्या प्रमाणें आणि ३२ वर्षे अवधूत वृत्तींत स्वतंत्राधिकार चालवून कलिवर्ष ३३७३ ई. स. २७२ खरनामसंवत्सर मार्गशीर्ष व ॥ १ रोजीं कांचीवासिलोकां-च्यासमक्ष कायाधिरोहेश्वर नामक लिंगफाटून त्यालिंगांत सदेह शिरून गेलेत ।

(१४) चौदावेंपीठस्थ– विद्याघनेंद्रसरस्वती जन्मभूमी आंध्रदेश जाति आंध्रब्रांम्हण बापाचेंनांव बापन्नासोमयाजि पूर्वाश्रमनाम नारायण हे श्रीविद्येचे उपासक होते यांनी दक्षिणदेशीं अगस्तिकूटीं असणाऱ्या भैरवाची उग्रता शांत-करण्यानिमित्त तेथें जाऊन कांहीं कालपर्यंत तेथें तपश्चर्या करून त्या उग्रतेस शांतकेलें हे कलिवर्ष ३३७३ पासून ३४१८ पावेतोम्हणजे ४५ वर्षेयापीठाचा अधिकार चालवून ई. स. ३१७ धातुनामसंत्सर मार्गशीर्षवद्य ३० अमावास्येस रात्रीं त्या अगस्तिकूटांतच समाधिस्थ झालेत ।

(१५) पंध्रावेपीठस्थ—गंगाधरगीष्पतींद्रसरस्वती यांची जन्मभूमी कांचीक्षेत्र । जाति आंध्रब्रांम्हण पित्याचें नाव भद्रगिरी पूर्वाश्रमनाम सुभद्र आपले गुरु विद्याघनेंद्रसर-स्वतींच्या समाधिचें दर्शनकरण्या निमित्त निघून कांहीं दूर गेलेत तोंच मार्गांत अगस्तिमुनींची भेट झाली । त्यां-

जपासून श्रीविद्याउपासनेची पूर्णमाहिती करून घेतली। वत्या प्रमाणें ऐकाग्रचित्तानें बारा वर्षें (एकतप) पर्यंत तपकरून देवीच्या पूर्ण अनुग्रहासपात्र झालेत कलिवर्ष ३४१८ ते ३४३० पर्यंत अर्थात १२ वर्षें यापीठाचा अधिकार चालवून ई. स. ३२९ सर्वधारीनामसंवत्सर चैत्र शु. १ रोजीं त्या अगस्तिकूटांतच समाधिस्थ झालेत।

(१६) सोळावेपीठस्थ– उज्वलमहायतींद्रसरस्वती यांचीजन्मभूमि तापतीतिरीं पित्याचेनांव शंकरकेशव जाति महाराष्ट्रब्राम्हण यांनीं काश्मीरपासोन केरळदेशापरियंत संचार केला मार्गांत अद्वैतोपदेश करित करित केरळदेशांत पोहोंचले अनंतशयन म्हणजे त्र्यांदूर चा राजा कुलशेखर यानें या आचार्यांचा फार सन्मान केला त्याची अर्थात त्या कुलशेखरनामक राजाची साहित्यशास्त्रांत बरीच अभिरुचि आहे असेंपाहून त्यास आशिर्वाद दिला व त्या आशीर्वादें करून तो राजा साहित्यांत पूर्ण विद्वान झाला व त्याने आपल्या राज्यांत असणाऱ्या सकल दुर्मतांचे मूळच काढूनटाकिलें आणि सर्वत्र अद्वैताचें बीजारोपण केलें व त्याचेंच दृढीकरणही केलें। कलिवर्ष ३४३० ते कलिवर्ष ३४६८ परियंत म्हणजे ३८ वर्षें पीठाधिकार चालवून

१६७ ई. स. अक्षयनामसंवत्सर वैशाखशु. ८ रोजीं काश्मीरदेशांत कलापूर नामक ग्रामांत हे आचार्य समाधी घेते झालेत ॥

१७. सत्रावेंपीठस्थ— बाळगुरु सदाशिवेंद्रसरस्वती यांची जन्मभूमि काश्मीरदेशांत पित्याचेंनांव काश्मीरामात्यश्रीदेवमित्र जाति गौडब्रांम्हण यांचे पूर्वाश्रमनांव सिंधुदत्त जन्मतांच अद्वैत म्हणजे पूर्णयोगी आहे असें यांच्या चिन्हांवरून अदमास बांधून पित्याने (जोजैनमतांतहोता,) याबालकास सिंधु नदांत टाकून दिले । तेव्हां त्यानदाने या शिशूस कमल पत्राचा आधार दिला त्या आधारें वहात वहात पुष्पापुर नामक गावांचे निकट येऊन पोहांचला त्या ग्रामीं राहणारा भूरिवसू नावाचा एक ब्रांम्हण स्नाना निमित्त तेथें आला तोंच हाबालक (मुलगा) तूंघे आणि पुत्रापरीयाचें संगोपनकर अशी झालेली आकाशवाणी ऐकून तो ब्रांम्हण अति आनंदितचित्तानें त्याबालकास घेऊन आपलेघरीं गेला व पुत्रापरीत्याचेंसंगोपनकरूंलागला त्याच मुलास पुढें उज्ज्वलमहायतींद्रसरस्वती यांचा अनुग्रह झाला व १७ वर्षांच्यावयांतच आश्रमहोऊनपीठाधिकारमिळाला । यांनी गुरुकृपेने आसेतुहिमाचल

संचारकरून दुर्मतांचीखंडना व अद्वैताचीस्थापना केली, व शिष्यांना ५० वेळभाष्य शिकविलें यांनी केवल ८वर्षे पीठाधिकारचालवला कलिवर्ष ३४६८ ते ३४७६ पावेतों अधिकार चालवून ई.स. ३७५ भवनामसंवत्सर ज्येष्ठशु ॥ १० रोजीं नाशिक त्र्यंबकीं समाधीघेतली ।

१८. अठरावेपीठस्थ सुरेंद्रयोगीतिलकेंद्रसरस्वतीजाति महाराष्ट्रब्राम्हण बापाचेंनांव— माधव यांनी काश्मीरदेशीं सुरेंद्रनामीराजाच्यासभेंत चार्वाकमताभिमानी दुर्दिवीना वाचे पंडित वत्यांचे सहायार्थ आलेला लोकायतमताभिमानी अमरगुरुनांवाचापंडितयादोघांसही वादांतजिंकिलें हें पाहून तो राजा फारप्रसन्नझाला व यांसकांहींगांव बक्षिसादिलेत जे आजामितीस चालू आहेत यांनीं कलिवर्ष ३४७६ ते ३४८६ पर्यंत म्हणजे १० वर्षे पीठाधिकार चालवून ई. स ३८५ तारणसंवत्सर मार्गशीर्षशु ॥ १ रोजीं उज्जयनींत समाधीघेतली ।

१९. एकोणीसावें पीठस्थ -- मार्तंडविद्याघनेंद्रसरस्वती । बापाचेंनांव उमेशशंकर पूर्वाश्रमनांव श्रीकंठ । यांनीं १३ वर्षे पीठाधिकार चालविला पूर्वसंस्कारें यांना कुष्ट झाली त्याचें निवारणार्थ यांनी फार नेमाने व कडक-

रीतीनें देवीची सेवा केली व नित्यप्रति श्रीसूर्यनारायणास मौन धारण करून १००८ नमस्कारही घालित असत । या आराधने करून श्रीदेवीचा पूर्ण अनुग्रह मिळवून इच्छा मरणीं झालेत— वयाच्या १८ वें वर्षी यांनी आश्रम धारण केला । कलिवर्ष ३४९९ ई०स ३९८ तथा हेविलंबी नाम संवत्सर आश्वीनशु ७ रोजीं गोदा तटाकीं यांनी समाधी घेतली ।

२०. वीसावें पीठस्थ अर्भकशंकरेंद्रसरस्वती पूर्वाश्रमनाम मूकार्भक । पित्याचें नांव खल्वाट वीर मातेचेंनांव विद्यावती जाति जोशी यांनी गुरु कृपा संपादन केली पूर्ण गुरु भक्तहोते । गुरुकृपेनेंच यांचे मूकत्व गेलें व कवित्व शक्ति आली । आपल्या कवित्व शक्तिनें यांनी प्रवररामिल्लमेंठक मातृगुप्त, राजश्रीहर्षापरपरियाय विक्रमादित्यादि मोठमोठ्या कवीनां जिंकिलें सुषमा नामक एक ग्रंथही केला प्राचीन शंकर विजय ग्रंथही यांनींच केला कलिवर्ष ३४९९ पासून कलिवर्ष ३५३८ पावेतो म्हणजे ३९ वर्षे परियंत पीठाधिकार चालवून ई०स ४३७ तथा धातुनाम संवत्सर श्रावण शु० १५ रोजीं गोदावरीचे तीरीं या आचार्यांनी समाधी घेतली ।

२१ एकविसावेंपीठस्थ सार्वभौमगुरुचंद्रचूडेंद्रसरस्वती । यांची जन्मभूमि कोंकणदेश पित्याचेंनांव अच्युत पूर्वाश्रम नांव मातृगुप्त— पूर्वी हे याच कामकोटी पीठांत देवाकरितां गंध काढण्याचे काम करीत असत । अर्भकशंकरेंद्रसरस्वतीची यांच्यावर पूर्ण कृपा होती गुरु कृपेनेच हे विद्वान् झालेत कवित्वाची शक्ति वाढवून कविता करूं लागलेत यांच्या चमत्कारिक कविता शकीवर विक्रमास फार आनंद झाला व यांना काश्मीर देशचें राज्य ही दिलें कांही काल परियंत त्या राजश्रीचा उपभोग घेऊन विक्रमाचा मृत्यु होतांच आपण ही वैराग्यानें तें राज्य सोडून अर्भकशंकरेंद्रसरस्वती पासून आश्रम धारण केला व या पीठाचे अधिपति झालेत दहा वर्षे पीठाधिपती राहिले या दहा वर्षांत देखील काशी वासच केला कलिवर्ष ३५३८ तें ३५४८ पावेतो ह्मणजे ई. स. ४४७ जयनामसंवत्सर श्रावण वद्य ८ रोजीं श्रीकाशीक्षेत्रीं समाधिस्थ झालेत ।

२२ बाविसावें पीठस्थ परिपूर्णबोधेंद्रसरस्वती जन्मभूमि रत्नागिरी पित्याचें नांव रमेश दीक्षित पूर्वाश्रमनांव माधव हे केवळ वैद्यशास्त्रांत निपुण होते यांनीं अश्माभिला-

एक मंत्राची साधना केली होती हे कलिवर्ष ३५४८ पासून ३५८२ पावेतो अर्थात ३४ वर्षे पीठाधिकार चालवून ई. स. ४८१ तथा रौद्रीनाम संवत्सर कार्तिक शु. ९ रोजीं श्रीजगन्नाथ पुरींत समाधिस्थ झालेत ।

२३ तेविसावें पीठस्थ सच्चित्सुखेंद्रसरस्वती यांची जन्मभूमि चिक्काकुल जाति आंध्र ब्राम्हण पित्याचें नांव सोमण्णा पूर्वाश्रमनांव गिरीश हे सुब्रंम्हण्याचे पूर्ण इष्टि असत यांनी आपल्या तपोबलाने आर्यभट नां वाच्या जोतिषीला कि जो छायाग्रहणा निमित्त निरीक्ष रेषे परियंत जाऊन आला होता व अगदीं नास्तिक असे त्यास प्रायश्चित्त देऊन स्वकर्मानुष्ठान करण्या योग्य आस्तिकोपदेश देऊन आस्तिक करून घेतला कलिवर्ष ३५८२ ते ३६१३ म्हणजे ३१ वर्षे परियंत या पीठावर आपला अधिकार चालवून ई. स. ५१२ खरनाम संवत्सर वैशाख शु ७. रोजीं जगन्नाथ पुरींत हे आचार्य समाधिस्थ झालेत ।

२४ चोविसावे पीठस्थ चित्सुखेंद्रसरस्वती जन्मभूमि कोंकण जाति कोंकणस्थ ब्राम्हण पूर्वाश्रम नाम शिवराम यांनी आपले गुरू सच्चित्सुखेंद्रसरस्वती पासून दीक्षा घेऊन कलिवर्ष ३६१३ तें ३६२८ पावेतो म्हणजे १५ वर्षे

या पीठावर आपला अधिकार चालवून ई. स. ५२७ पराभव नाम संवत्सर श्रावणमासीं ९ ला रत्नागिरींत समाधी घेतली ।

२५ पंचविसावे पीठस्थ सिद्धगुरूसच्चिदानंदघनेंद्रसरस्वती जाति द्राविड ब्रांम्हण जन्मभूमि चोळदेशांत श्रीमुष्ण नामक गांवांत पित्याचे नांव कृष्ण पूर्वाश्रमनांव शिवसांब यांनी तीन वेळ सारे पृथ्वी संचार केला मंथन भटानें आपल्या केलेल्या काव्यांत यांच्या चरित्राचे सविस्तर वर्णन केलें आहे यांनी कलिवर्ष ३६२८ ते ३६४९ पावेतों म्हणजे २१ वर्षे पीठाधिकार चालवून ई. स. ५४८ तथा प्रभवनामसंवत्सर आषाढ शु १ रोजीं गोकर्णांत समाधी घेतली ।

२६ सव्विसावे पीठस्थ प्रज्ञानघनेंद्रसरस्वती यांची जन्मभूमि पिनाकिनीचे तीरावर जाति द्राविड ब्रांम्हण पित्याचे नांव पद्माकर पूर्वाश्रम नांव सोनागिरी यांनी आमरणांत कांची वासच केला कलिवर्ष ३६४९ ते ३६६५ पावेतो म्हणजे १६ वर्षे या पीठावर आपला अधिकार चालवून ई. स. ५६४ सुभानु नाम संवत्सर वैशाख शु. ८ ते दिनीं श्रीकांची क्षेत्रीं समाधी घेतली ।

२७ सत्ताविसावें पीठस्थ चिद्विलासेंद्रसरस्वती जन्मभूमी काळहस्ती बापाचें नांव मधुसूदन पूर्वाश्रम नांव हरिकेशव यांनी आमरणांत कांचीवास करून तपश्चर्येंत आपला काळ घालविला कलिवर्ष ३६६५ ते ३६७८ पावतो म्हणजे १३ वर्षे पर्यंत पीठाधिकार चालवून ई. स. ५७७ दुर्मुखीनांव संवत्सर चैत्र शु. १ रोजीं कांचींत समाधी घेतली ।

२८ अठ्ठाविसावे पीठस्थ भद्राचलमहादेवेंद्रसरस्वती जन्मभूमी भद्राचल बापाचें नांव भानुमिश्र पूर्वाश्रम नाम शेषमिश्र जाति मैथिलब्रांम्हण हे केवल तपस्वी होते यांनी कलिवर्ष ३६७८ ते ३७०२ पर्यंत म्हणजे २४ वर्षे या पीठावर अधिकारी राहून ई स ६०१ रौद्रीनाम संवत्सर कार्तिक वद्य १० रोजीं कांचींतच समाधि घेतली ।

२९ एकोणविसावे पीठस्थ पूर्णबोधेंद्रसरस्वती जन्मभूमी कांची बापाचें नांव श्रीपती पूर्वाश्रम नाम कृष्ण यांनी सारेजन्म भर तपश्चर्या केली कलिवर्ष ३७०२ ते ३७१९ पावेतो म्हणजे १७ वर्षे पीठाधिकार चालवून ई. स. ६१८ ईश्वरनाम संवत्सर श्रावण शु. ११ तेदिनीं कांचीतच समाधी घेतली ।

३० तिसावे पीठस्थ बालबोधेंद्रसरस्वती जन्मभूमी कालहस्ती आंध्रब्राम्हण पित्याचें नांव कालहस्तेश्वर पूर्वाश्रम नाम बालैय्या हेपूर्ण तपस्वी होते यांनी कलिवर्षे ३७१९ ते ३७५६ पावेतों म्हणजे ३७ वर्षे पीठाधिकारी राहून ई. स. ६५५ आनंदनामसंवत्सर वैशाख शु. ४ रोजीं कांचीतच समाधी घेतली ।

३१ एकतिसावे पीठस्थ शीलानिधीब्रम्हानंदघनेन्द्रसरस्वती जन्मभूमी चोळदेशांत गरुड नदींचें तीरीं द्राविडब्राम्हण हे सहा शास्त्रांत निपुण होते काश्मीर देशच्या ललितादित्य चक्रवर्तीनें यांची विद्या पाहून चांगला सत्कार केला भवभूति कवीनेंही आपल्या केलेल्या मालती माधवी नामक ग्रंथांत यांची चांगली स्तुती केली आहे कलिवर्ष ३७५६ ते ३७६९ पावेतो म्हणजे १३ वर्षे पीठाधिपती राहून ई स ६६८ प्रभवनामसंवत्सर ज्येष्ठ शु. १२ रोजीं कांची क्षेत्रांतच यांनी समाधी घेतली ।

३२ बत्तिसावे पीठस्थ चिदानंदघनेंद्रसरस्वती पित्याचें नांव अणुशंकर यांचे पूर्वाश्रम नांव पद्मनाभ यांनी आपल्या तप सामर्थ्यें करून कर्नाटक देशचे शशीकुमार नावचे राजास जो शत्रू कडून राज्य भ्रष्ट झाला होता,

शरण येतांच पुन्हां राज्यावर बसविलें हे सदोदित वृक्षाचे जीर्ण पानांचा आहार करून लंबिका नावचे योग साधन करीत असत कलिवर्ष ३७६९ ते ३७७३ म्हणजे केवल चार वर्षें परियंत पीठाधीश राहून ई. स. ६७२ प्रजोत्पत्ती नाम संवत्सर मार्गशीर्ष शु. ६ रोजीं कांचीसच यांनीं समाधी घेतली ।

३३ तेहतिसावें पीठस्थ सच्चिदानंदेंद्रसरस्वती यांची जन्मभूमि सरस्वती नदी तीरीं बापाचें नांव रामन्ना यांचे पूर्वाश्रम नांव तिम्मण्णा आंध्रब्रांम्हण हे श्रीविद्या उपासक होते सदोदित देवीचीच आराधना करीत असत यांना सगळ्या भाषा येत होत्या जीर्णदशेस प्राप्त झालेलें कांचीचे मठ पुन्हां नवीन बांधविलें हे वीस वर्षें पीठावर आपला अधिकार म्हणजे कलिवर्ष ३७७३ ते ३७९३ पावेतों चालवून ई. स. ६९२ खरनामसंवत्सर भाद्रपद शु. ६ रोजी कांचींत समाधिस्थ झालेत ।

३४ चौतिसावें पीठस्थ चंद्रशेखरेंद्रसरस्वती जन्मभूमी वेगवतीचे तीरावर पित्याचेनांव महादेव पूर्वाश्रम नाम शंभू गुरु आज्ञानुरूप सर्वत्रसंचार करून नाना प्रकारचे दुर्मतांचे खंडन केलें व अद्वैताची वृद्धी केली संचार

समर्थी मार्गांत एक मुलगा दवाग्नींत सांपडून जळत आहे असें पाहून त्याला काढावे या उद्देशाने आपणही त्या अग्नींत उडी घातली तत्क्षणी तो अग्नि शांत झाला व त्या बालकास आपण बाहेर घेऊन आलेत यांनी जैनमताचे खंडन केलें सौगतमतीचणुक नावच्या पंडितासही जिंकिलें कलिवर्ष ३७९३ ते ३८११ पावेतो म्हणजे १८ वर्षें पीठाधिकारी राहून ई. स. ७१० सौम्यनाम संवत्सर मार्गशीर्ष वद्य ३० रोजीं यांनी कांचींतच समाधी घेतली ।

३५ पस्तिसावें पीठस्थ बहुरूप चित्सुखेंद्रसरस्वती वेदाचला जवळ उदयंपाक ग्रामांत उत्पन्न झालेत पित्याचें नांव विमलाक्ष पूर्वाश्रम नांव कमलाक्ष हे नेहमीं सैह्याद्रीचे कंदरेंत एकांत स्थानी बसून योगाभ्यास करीत असत कधींकधीं त्या योगसामर्थ्यें आपले रूप बदलून संचार ही करीत असत अश्या रीतीने २७ वर्षे यांनी गुहेंतच वासकेला म्हणजे कलिवर्ष ३८११ पासोन ३८३८ पावेतो २७ वर्षें या प्रकारें पीठाधिकारी राहून ई. स. ७३७ धातुनाम संवत्सर आषाढ शु. ६ रोजीं त्या गुहेंत च समाधी घेतली ।

३६ छत्तिसावे पीठस्थ चित्सुखानंदेंद्रसरस्वती यांची जन्मभूमि क्षीर नदीचे तीरावर पित्याचे नांव सोमगिरी पूर्वाश्रमनाम सुरेश यांनी कांही काल परियंत आपले गुरू-ची सेवा केली नंतर स्वतंत्र पीठाधिकारी राहून कलि-वर्ष ३८३८ ते ३८५७ पावेतो म्हणजे २१ वर्षे परियंत ई. स. ७५८ हेविलंबी नाम संवत्सर आश्वीन शु. १५ रोजीं श्रीक्षेत्र कांचीतच समाधी घेतली ।

३७ सदतिसावें पीठस्थ विद्याघनदेशिकेंद्रसरस्वती बापाचेंनांव भालचंद्र यांचे पूर्व नाव सूर्यनारायण त्या कालीं म्लेच्छ मताची वृद्धी होत आहे असें पाहून स्वधर्म रक्ष-णार्थ कोणीतरी सच्छिष्य भेटावा वा या उद्देशाने गुप्त सं चार करीत चिदंबर क्षेत्रा प्रत येऊन प्राप्त झालेत कलि-वर्षे ३८५७ ते ३८८७ म्हणजे ३० वर्षे पीठाधीश राहून ई. स ७८८ प्रभवनाम संवत्सर पौषवद्य २ रोजीं त्या चिदंबर क्षेत्रीं च धीरशंकरेंद्रसरस्वती यांस पीठाधीश स्थापून आपण समाधिस्थ झालेत ।

३८ अडतिसावे पीठस्थ धीरशंकरेंद्रसरस्वती जन्म-भूमि चिदंबर जाति द्राविड ब्रांम्हण पित्याचें नांव विश्व-जित्दीक्षित यांनीं तीन वर्षा परियंत गज गर्भात वास

केला गज गर्भ म्हणजे तीन वर्षे पावेतो मातेच्या उदरीं गर्भरूपानेंराहिले गर्भसंभवानंतरतिसरे मासींयांचे बाप वारलेत पति मरणानंतर अनाथा प्रमाणें दीन होऊन नाना प्रकारचे कष्टयांचे मातोश्रीस भोगावे पडले लोक लज्जित होऊन वनांत गेली व तेथेंच प्रसवली आणि या झालेल्या बालकांस वृक्षांच्या वाळलेल्या पानांत ठेऊन आपण गावांत परत आली जवळच व्याघ्रपाद् महर्षिचें स्थान होतें या बालकाचें रोदन श्रवण करून ती ऋषिपत्नी या बालकास आपले आश्रमास नेऊन त्याचे संगोपन करूं लागली ५ वर्षाचें मूल होतांच व्याघ्रपाद् महर्षिने या मुलाचे यज्ञोपवीतादि संस्कारही केलेत ऋषि आशिर्वादें करून या ५ वर्षाच्या वयांतच यामुलास सकल विद्याही आल्यात अर्थात सकल विद्येत परिपूर्ण झाला तेह्मां त्याच वर्षी म्हणजे ५ व्यावर्षी या मुलाने आश्रमही घेतलें आणि पीठाधिकारी झाला यापीठारोहण समयीं श्रीशंकरभगवत्पादाचार्य म्हणजे आदिशंकराचार्य ब्रंम्हदेवास बरोबर घेऊन या मानव शरीराने प्रत्यक्ष त्या समारंभांत आलेत । ब्रम्हदेवाने प्रसन्न होऊन यांस पादुकांचा एक जोडही दिला त्यावर आरूढ होऊन यांनी सर्व पृथ्वींत संचार केला व पृथ्वींत असणाऱ्या सकल विद्वानांला वादांत जिं-

कून आपले अद्वैतमताची दृढता केली यांना प्रत्यक्ष शंकर-भगवत्पादाचार्यांचाच मंत्रोपदेश झाला संचार करीत काश्मीरांत जेव्हां दाखल झालेत तर तेथील सर्वज्ञ पीठा-वर कोणी नाहीं असें पाहून आपण तेथील सकल विद्वा-नांशीं वाद केला व त्या सर्वांना वादांत जिंकून त्या पीठावर आरूढ झालेत त्या नंतर आपले शिष्य सच्चिद्विलासेंद्रस-रस्वती यांस कामकोटी पीठावर पीठस्थ नेमून आपण सकल शिष्यमंडळी सह श्री दत्तात्रेय महामुनींच्या गुहा द्वारापरियंत गेलेत गुहेच्या आंत जातांच अदृश्य होऊन ब्रह्मदेवानी दिलेल्या पादुका धारण करून गगन मार्गाने चीनदेश तुर्कदेश (तुर्कस्थान बाबलून अरेबिया) इत्यादि देशांत जाऊन तेथें असणाऱ्या विद्वान लोकांशी त्यांच्या रूपानेंच वाद घेऊन त्यांचे धर्माची त्या त्यानां माहिती करून देऊन आपण कैलासास जाते झालेत ही माहिती चालत आलेल्या परंपरे वरून व त्याकालचे पुरातन ग्रंथां-वरून प्रत्ययास येत आहे अर्थात समजत आहे या आचा-र्यांच्या या अलौकिक कृत्याचें वर्णन आदिशंकर विजयग्रंथांत आदिशंकराचार्यांचेंच आहे अश्याचुकीनें लिहिलें आहे कलिवर्ष ३८८९ ते ३९४१ पावेतों म्हणजे ५२ वर्षे या पीठावर वर

सांगीतल्या रीतीनें आपला पीठाधिकार चालवून ई. स. ८४० सिद्धार्थी नाम संवत्सर ज्येष्ठ वद्य ३० रोजीं श्रीदत्तात्रेय महामुनीचे गुहेंत अंतर्ध्यान झालेत् अर्थात गुप्त झालेत ।

३९ एकोणचाळिसावे पीठस्थ सच्चिद्विलासेंद्रसरस्वती जाति कान्यकुब्ज ब्राम्हण बापाचें नांव कमलेश्वर पूर्वाश्रम नांव श्रीपती हे पुष्कळ काळ पर्यंत पद्मपुरांत राहिले यांनी ध्वनी नामक ग्रंथ कर्ते आनंदवर्धनाचार्य, मुक्ताकण, शिवस्वामी, गजानन, रत्नाकरादि प्रभृति विद्वन्मंडळी पासून सन्मान मिळवला कलिवर्ष ३९४१ तें ३९७४ पावेतो म्हणजे ३३ वर्षें पीठाधिकार चालवुन ई. स. ८७३ नंदननाम संवत्सर वैशाख शु. १५ रोजीं कांचीसमीप समाधी घेतली ।

४० चाळिसावे पीठस्थ महादेवेंद्रसरस्वती जन्मभूमी कर्नाटक जाति कर्नाटक ब्राम्हण बापाचें नाम कन्नैया पूर्वाश्रम नाम शिवराम हे पूर्णतपस्वी होते यांनी कलिवर्ष ३९७४ ते ४०१६ पावेतो म्हणजे ४२ वर्षें पीठाधिकार चालवून ई. स. ९१६ भवनाम संवत्सर वैशाख वद्य ६ रोजीं कांची क्षेत्रीं समाधी घेतली ।

४१ एकेचाळिसावे पीठस्थ गंगाधरेंद्रसरस्वती जन्म-भूमी भीमानदीचेतीरीं जाति आंध्रब्राम्हण बापाचे नांव उमेश भट पूर्वाश्रमनाम अप्पन्ना हे श्रीविद्येचे उपासक होते यांनीं कर्पूरमंजरी नामक ग्रंथ केला व बालरामायण प्रपंच पांडव सिद्धसालमंजिका हे तीन नाटकही केलेत यायावर राज-शेखरमहाकविने यांचेंच कृपाकटाक्षें वरील ग्रंथ तयार केलेत अंध झाल्यावर यांचे आशीर्वादानेच त्या कवीस पुन्हां डोळे आलेत त्यानंतरही कांहीं ग्रंथ यानी केले आहेत कलि-वर्ष ४०१६ ते ४०५१ पावेतो म्हणजे ३५ वर्षें पीठा-धिकार चालवून ई. स. ९५१ सौम्यनाम संवत्सर श्रावण शु. १ रोजीं कांचींतच यांनी समाधी घेतली ।

४२ बेचाळिसावें पीठस्थ ब्रंह्मानंदघनेंद्रसरस्वती जन्म भूमी कांची बापाचें नांव सुब्रंह्मण्यभट पूर्वाश्रम नांव नर-सिंव्हभट हे केवळ ब्रंम्हवेत्ता होते यांनी आपलें सर्व आयुष्य केवळ वेदांतांतच लाविले कलिवर्ष ४०५१ ते ४०७९ पावेतों म्हणजे २८ वर्षें पर्यंत पीठाधिकार चालवून ई. स ९७७ ईश्वरनाम संवत्सर कार्तिक वद्य ९ रोजीं प्रात:काल चे वेळेस शिष्य वर्गास भाष्याचा उपदेश करीत असतां समाधिस्थ झालेत यांचे समाधिस्थल कांचीसच आहे ।

४३ त्रेचाळिसावें पीठस्थ आनंदघनेंद्रसरस्वती जन्मभूमी तुंगभद्रातीरीं आंध्रब्राम्हण बापाचें नांव सुदेवभट पूर्वाश्रमनाम शंकरपंडित हे पूर्ण ब्रह्मज्ञानी होते कलिवर्ष ४०७९ ते ४११५ पावेतो म्हणजे ३६ वर्षें पीठाधिकार चालवून ई. स. १०१४ प्रमादीनाम संवत्सर चैत्रशु ९ रोजीं माध्यान्हकालचे वेळेस कांचीस समाधीस्थ झालेत ।

४४ चौरेचाळिसावें पीठस्थ पूर्णबोधेंद्रसरस्वती जन्मभूमी कर्नाटकांत बापाचेनांव शिवैय्या पूर्वाश्रमनाम हरिपंडित हे नेहमी ब्रम्हज्ञानांतच निमग्न रहात होते कलिवर्ष ४११५ ते ४१४१ पावेतो म्हणजे २६ वर्षें पीठाधिकार चालवून ई. स १०४० प्रमाथी नाम संवत्सर भाद्रपद व १३ रोजीं प्रात: कालचे समयीं कांचीस समाधिस्थ झालेत ।

४५ पंचेचाळिसावे पीठस्थ परमशिवेंद्रसरस्वती पित्याचे नांव शिवसांब यांचे पूर्वाश्रमनाम श्रीकण्ठ यांनीं सोमक नावाच्या ब्राह्मणास आश्रम देऊन पीठावर त्यास स्थापन करून आपण सैह्याद्रीचे एका गुहेंत आत्मनिष्ठा वृत्तींत (अजगरवृत्तींत) राहून आपला वेळघालविला कलिवर्ष ४१४१ तें ४१६२ पावेतों म्हणजे २१ वर्षें अधि-

कारकरून ई. स. १०६१ शार्वरीनाम संवत्सर आश्वीन शु. ७ रोजीं रात्रौ सह्याद्रीचे गुहेंतच समाधी घेतली ।

४६ शेहचाळीसावेंपीठस्थ सांद्रानंदबोधेंद्रसरस्वती पित्याचेंनांव सूर्यनारायण पूर्वाश्रमनाम सोमकवी यांनी पूर्वाश्रमांत असतानां कथासरितसागर नांवाचा एक नवीन ग्रंथ रचला नवीन भोजराजा यांच्या कवित्वावर फार प्रसन्न झाला व यांस मोत्यांचीपालखी बक्षीस दिली काश्मीर देशच्या कलहेश्वर नांवाच्या राजानेही यांचा फार सत्कार केला तेथील मंत्रीचे सहायतेने मुसलमानलोकांच्या त्रासा पासून यांचे रक्षणझालें आणि निःशंक त्या मोत्यांच्या पालखींत बसून सारे ठिकाणीं शिष्य वर्गास अद्वैतोपदेश करित संचारही केला आणि अद्वैताची पुन्हां स्थापना केली हे कलिवर्ष ४१६२ ते ४१९९ म्हणजे ३७ वर्षांपरियंत स्वतंत्राधिकार केला त्या पूर्वी २१ वर्षां पावेतों आपले आश्रम गुरु परमशिवेंद्रसरस्वती यांचे आधीन शिष्यरूपाने वागलेत ई. स. १०९८ ईश्वर नाम संवत्सर आषाढ शु. १५ रोजीं अरुणाचलक्षेत्रीं समाधिस्थ झालेत ।

४७ सत्तेचाळीसावेंपीटस्थ चंद्रशेखरेंद्रसरस्वती यांची जन्म भूमि कुंडानदीचे तीरीं पित्याचें नांव शुकदेव पूर्वाश्रवनाम श्रीकंठ जाति द्राविड ब्रांम्हण हे सर्वेशास्त्रांत प्रवीण होते । जयदेव, मंखण, कृष्णमिश्र । सुहल, आदि, कवींनी आप आपल्या केलेल्या ग्रंथांत यांची फार स्तुति केली आहे कारण ते लोक कांही दिवस संचारांत ही होते यांनी जैनमतस्थ कुमारभूपाल राजाचे सभेंत असणारा हेमाचार्य नांवांच्या विद्वनाशी वाद करून त्याचें खंडन केलें हें पाहून जैसिंहभूपाल कुमारभूपाल हे दोघे राजे यांच्या वादावर फारच प्रसन्न होऊन कांहीं दिवस परियंत यांच्या संगे फिरत होते कलिवर्ष ४१९९ ते ४२६७ पावेतो म्हणजे ६८ वर्षें पीठाधिकारी राहून ई. स. ११६६ पार्थिव नाम संवत्सर चैत्र शु. १५ रोजीं अरुणाचल येथें समाधी घेतली ।

४८ अठ्ठेचाळीसावेपीठस्थ अद्वैतानंदबोधेंद्रसरस्वती यांचे दुसेरें नांव चिद्विलासेंद्रसरस्वती जम्म भूमी पीनाकिनी तीरावर बापाचे नांव परमेशः पूर्वाश्रम नाम सीतापती यांनी ब्रंम्हविद्याभरण विवर्णादि अनेक प्रबंध केले श्री हर्षादि महाकवीला यांनी वादांत जिकिलें कलिवर्ष ४२६७

ते ४३०१ पावेतों म्हणजे ३४ वर्षे पीठाधिकार चालवून ई. स. १२०० सिद्धार्थीनाम संवत्सर ज्येष्ठ शु. १० रोजीं पूजासमर्थी चिदंबर क्षेत्रांत समाधी घेतली ।

४९. ऐकुणपन्नासावेपीठस्थ— छायावन महादेवेंद्रसरस्वती जन्मभूमी चोळदेशांत (छायावनांत) द्राविड ब्रांम्हण-बापाचेंनाव अच्युत पूर्वाश्रमनाम गुरुमूर्ती हे श्रीविद्येचे उपासक होते यांनीं वैदिकाचाराने कोटि होम केलेत यांनी कलिवर्ष ४३०१ ते ४३४८ पावेतों म्हणजे ४७ वर्षे पीठाधिकार चालवून ई. स. १२४७ पराभवनामसंवत्सर कार्तिक वद्य ८ रोजीं गरुड नदीचे तीरीं समाधी घेतली ।

५० पन्नासावेंपीठस्थ जान्हवीचंद्रचूडेंद्रसरस्वती जन्मभूमी गरुडनदीच्यातीरीं बापाचें नांव अरुणागिरी पूर्वाश्रमनाम गंगेशः हेही श्रीविद्येचे उपासक असून यांनीं वैदिकाचाराने कोटि होमकेले कलिवर्ष ४३४८ ते ४३९८ पावेतों म्हणजे ५० वर्षे पीठाधिकारी राहून ई. स. १२९६ दुर्मुखीनाम संवत्सर ज्येष्ठ शु. ६ रोजीं गरुड नदीचे तीरीं समाधिस्थ झालेत ।

५१ एकावन्नावेपीठस्थ विद्यातीर्थेंद्रसरस्वती जन्मभूमी

बिल्वारण्यांत बापाचें नांव शार्ङ्गपाणी पूर्वाश्रम नांव सर्वज्ञ विष्णू यांनीं सायणाचार्य व माधवाचार्य यांना भाष्यशिकविलें कलिवर्ष ४३९८ ते ४४८६ पावेतों म्हणजे ८८ वर्षें पीठाधिकार चालवून ई. स. १३८४ रक्ताक्षी नाम संवत्सर माघ व ॥ ९ रोजीं हिमालयांत समाधी घेतली । म्हणजे ७३ वर्षें पर्यंत एकाच जागेवर राहून ८ शिष्यांस दिग्विजय करण्या योग्य सकल विद्येंत निपुण केलें नंतर तेथून निघून हिमालयास जातेवेळीं सकलविद्यासंपन्न श्रीकटाक्ष संपादित म्हणजे ज्यांस लक्ष्मी प्रसन्न झाली होती अशे जे विद्यारण्य त्यांस स्वधर्म (आस्तिकधर्म) परिपालनार्थ एक राज्य स्थापित करण्याची आज्ञा देऊन आपण त्या हिमालयाच्या गुहेंत बसून १५ वर्षे पर्यंत तपश्चार्यंकेली आणि सर्वशिष्यांच्या सन्मुख या स्थूल शरीरास त्यागून तेजो रुपानें गगनमार्गानेस्वर्गासजातेझाले ।

५२ बावन्नावेपीठस्थ शंकरानंदेंद्र सरस्वती जन्मभूमी चोळदेशांत मध्यार्जुनीं कर्नाटक ब्राम्हण बापाचें नांव बालचंद्रदीक्षित पूर्वाश्रमनाम महेशः कर्नाटक देशांत मध्वमत, वीर शैवमताची अति प्रबलता पाहून (ऐकून) विद्यारण्यादि आपिल्या आठ शिष्यांस त्या दुर्मतांचे खंडन कर-

ण्यानिमित्त व अद्वैताचे दृढीकरण करण्या निमित्त, आणि श्रृंगेरी पीठाची मलिनतानाशकरून यापीठास पुनरुत्तेजन देण्या निमित्त यांस श्रृंगेरी कडे जाण्याची आज्ञा दिली कलिवर्ष ४४८६ ते ४५१८ म्हणजे ३२ वर्षें पीठाधिकार चालवून ई. स. १४१६ दुर्मुख नाम संवत्सर वैशाखशु. ९ रोजीं कांची जवळ समाधी घेतली ।

५३ त्रेपन्नावे पीठस्थ पूर्णानंद सदाशिवेंद्रसरस्वती जन्म भूमी नागाराण्य बापाचें नांव नागनाथ पूर्वाश्रम नाम नागारण्य हे संचार करीत करीत जेह्वां नैपाळास पोहोंचले तेह्वां तेथें दुष्काळ पडला होता पर्जन्य नसल्या कारणानें तेथील जनास फार कष्टहोतें असें पाहून आपल्या तपसामर्थ्यानें पर्जन्य वृष्टी केली आणि सर्वजनांस सुखी केलें हा चमत्कार पाहून तेथीलराजानें यांचा चा चांगला सत्कार केला हे कलिवर्ष ४५१८ ते ४५९९ पावेतों म्हणजे ८१ वर्षें पीपाधिकारी राहून ई. स. १४७७ पिंगलनाम संवत्सर ज्येष्ठ शु. १० रोजीं कांची क्षेत्रांत समाधिस्थ झालेत ।

५४ चौपन्नावेपीठस्थ व्यासाचल महादेवेंद्र सरस्वती जन्मभूमी कांची आंध्रब्राम्हण बापाचें नांव कामेश्वर पूर्वा-

श्रमनाम कुप्पण्णा मातृनांव कमलांबा यांनीं संचार केला नाहीं व्यासाचलीय नावांचा एकग्रंथ ही केला कलिवर्ष ४५९९ ते ४६०८ पावेतों म्हणजे ९ वर्षे पीठाधिकार-चालवून ई. स. १५०६ अक्षयनाम संवत्सर आषाढ व १ रोजीं व्यासाचलांत समाधी घेतली ।

५५ पंचावन्नावेंपीठस्थ अरुणगिरी चंद्रचूडेंद्रसरस्वती जन्मभूमी मणिमुक्तानदीच्या तीरीं अश्मशालेंत बापाचें नांव पुरारि पूर्वाश्रमनाम अरुणगिरी आईचेंनांव श्रीमती यांनीं आपलें सर्व आयुष्य श्रीचंद्रमौळीश्वराच्या सेवेंतच घालविलें कलिवर्ष ४६०८ ते ४६२४ पावेतों म्हणजे १६ वर्षे अधिकार चालवून ई. स. १५२२ सुभानुनाम सं० फा० शु. ११ रोजीं कांचींत समाधी घेतली ।

५६ छप्पन्नावेपीठस्थ सर्वज्ञसदाशिवेंद्र सरस्वती यांची जन्मभूमि पिनाकिनीचे तीरावर जाति आंध्र ब्राम्हण पित्याचें नाव चिक्कना पूर्वाश्रम नांव बोधेश्वर यांनी संचा-रांत असतानां प्रवीर सेतु नामक राजास अद्वैतोपदेश केला या उपदेशाने त्यास फार आनंद होऊन त्यानें यांचा (आचार्यांचा) फारच सत्कार केला व शिस्य बनला यांनीं बौधार्य आणि पुण्यश्लोक मंजरी असे दोन ग्रंथ

तयार केलेत कलिवर्ष ४६२४ ते ४६३९ म्हणजे १५ वर्षे पीठाधिकार चालवून ई. स. १५३७ तथा विलंबी नाम संवत्सर चैत्र वद्य ८ रोजीं श्रीरामेश्वरीं सामाधी घेतली ।

५७ सत्तावन्नावेपीठस्थ परमशिवेंद्रसरस्वती जन्मभूमी पंपातीरीं बापाचेंनांव परमेश्वर आंध्र ब्राम्हण पूर्वाश्रम नाम शिवरामकृष्ण हे श्रीविद्येचे उपासक होते व शिवयोग नामक योगांत निष्णांत व महा ज्ञानी होते यांच्या केवल अवलोकनानेंच जनांस ज्ञान उत्पन्न होतें यांचे शिष्य सदाशिवब्रंम्ह नामक ब्रांम्हण मुख्य ज्यां वर यांचा पूर्ण अनुग्रह झाला ते जगद्विख्यात झालेत त्यांनीं गुरुस्तुती पर एक ग्रंथहीकेलाआहे त्याग्रंथाचें नांव आत्मविलास ठेविलें आहे कलिवर्ष ४६३९ ते ४६८६ पावेतों म्हणजे ४७ वर्षे पीठाधिकार चालवून ई. स. १५८४ पार्थिवनाम संवत्सर श्रावण शु. १० रोजीं श्वेतारण्यांत समाधी घेतली । या समाधिस्थलांत एक शिवालय बांधवून त्यास तंजावरच्या मऱ्हटीराजानें (शहाजीमहाराजानें) देवालयाच्या पूजे निमित्त एक गांव लावून दिलें जें आजपर्यंत चालत आहे ।

५८ अठ्ठावन्नावेंपीठस्थ विश्वाधिक आत्मबोधेंद्रसरस्वती जन्मभूमी वृद्धाचल बापाचेंनांव विश्वमखी पूर्वाश्रम नाम विश्वेश्वर आंध्रब्रांम्हण हे आसेतु हिमाचल संचार करते वेळीं जनांस अद्वैतोपदेश करीत असत रुद्रभाष्यादि ग्रंथ केले यांनीं गंगातीरीं पुष्कळ दिवसवास केला तेथील शिष्यमंडळीस भाष्यशिकवून परत येते वेळीं कलिवर्ष ४६८६ ते ४७३८ पावेतों म्हणजे ५२ वर्षें पीठाधिकार चालवून ई. स १६३६ ईश्वरनामसंवत्सर आश्वीन व ॥ ८ रोजीं गरुड नदीचे तीरीं समाधी घेतली ।

५९ एकुणसाठावेंपीठस्थ भगवन्नामबोधेंद्रसरस्वती जन्मभूमी कांची मंडनमिश्र अग्रहारांत द्राविडब्रांम्हण बापाचें नांव केशव पांडुरंग पूर्वाश्रम नाम पुरुषोत्तम कलि प्राबल्यामुळें एकाग्र चित्त करून तपकरणें अशक्य आहे असें जाणून यांनीं नामपारायण (सदा) सर्वदा भक्तिनें ईश्वर नामोच्चारकरणे हेंच कलिमध्यें श्रेष्ठ आहे यांनीं भक्ति मार्गाचा प्रसारकेला यांनीं पुष्कळशे भक्तिमार्ग दर्शक ग्रंथ ही केलेत कलिवर्ष ४७३८ ते ४७९२ पावेतों म्हणजे ५४ वर्षें पीठाधिकार चालवून ई. स. १६९० प्रजोत्पत्ती नाम संवत्सर भाद्रपद शु. १५ रोजीं मध्याचलाजवळ गोविंद

पुर नामक ग्रामांत समाधी घेतली ।

६० साठावेपीठस्थ अद्वयआत्मप्रकाशेंद्रसरस्वती जन्मभूमी वसिष्ठ नदीचेतीरीं यांची जाति द्राविड ब्रांम्हण पित्याचेंनांव परशराम पूर्वाश्रमनाम गोविंद यांनीं केवल दक्षिण देशांतच संचार केला तंजावरच्या मराठे राजाने यांचा सत्कार केला त्याराजाच्याच आश्रयाखालीं या चोळदेशांत वास केला कलिवर्ष ४७९२ ते ४८०४ पावेतों म्हणजे १२ वर्षें पीठाधीश राहून ई. स. १७०२ सुभानुनाम संवत्सर चैत्र वद्य २ रोजीं मद्रास येथें समाधिस्थ झालेत ।

६१ एकसष्ठावेंपीठस्थ महादेवेंद्रसरस्वती यांची जन्मभूमी कुशस्थली कर्नाटक ब्रांम्हण पूर्वाश्रम नाम नारायण हे केवल तपस्वी होते कलि वर्ष ४८०४ तें ४८३१ पावेतो म्हणजे २७ वर्षें पीठाधिकारी राहून ई. स. १७२९ साधारणनाम संवत्सर ज्येष्ठ शु. ९ रोजीं मद्रास येथें समाधिस्थ झालेत ।

६२ बासष्टावे पीठस्थ चंद्रशेखरेंद्रसरस्वती जन्मभूमि उदयंपाक कर्णाटक ब्रांम्हण यांनीं पुष्कळ देशांत संचार केला त्या काळीं मुसलमान राज्याची फार भरभराट पाहून

स्वधर्म रक्षणार्थ कांची क्षेत्राहून निघून संचार करीत अनंतशयन पाळयंकोट, रामनाथपुर, पुदुकोटा इत्यादि संस्थानांत जेथें गेलेत तेथील राजे लोकांनी यांचा योग्य सन्मान केला व पीठाची बचावणी केली जेह्वां ओडयारु-पाळयं नावाच्या गांवीं गेलेत म्हणजे प्रविष्ट झालेत तेह्वां तेथील राजाने अति श्रद्धा भक्तिनें या पीठाची सेवा केली व या आचार्यांस आपल्या राष्ट्रांतच ठेऊन घेतलें हें वर्त-मान तंजावरचे मराठे भोंसल राजा छत्रपती प्रताप सिंहा-स कळतांच स्वत: आपणच स्वामी महाराजांच्या दर्शना निमित्त तेथें आला व आचार्यांशी आपण माझे राज्यांत च रहावें अशी माझी विनंती आहे त्या राजाची पूर्णश्रद्धा भक्ति पाहून प्रसन्न झाले व त्याससांगितले कीं काशी क्षेत्रा पेक्षांही अधिक महत्व आहे अश्या कुंभकोण क्षेत्रांत च आम्ही वास करूं असें निश्चयात्मक अभिवचन श्रवण करतांच राजा संतोष पावला व आचार्यांना राहण्यास एक मोठी इमारत तयार लागलीच करविली व त्या मठांत त्यांना ठेऊन आपण सेवेंत तत्पर राहिला व त्या खर्चा निमित्त म्हणजे मठाचें व देवाचें इत्यादि खर्च सुरळित रीतीनें चालावा म्हणून आचार्यांना कांही गांव अर्पण करिता

झाला जे गांव आज मितीसही चालत आहेत (कायम आहेत) कलिवर्ष ४८३१ ते ४८८३ पावेतों म्हणजे ५२ वर्षे पीठाधिकार चालवून ई. स. १७८९ शुभकृन्नाम संवत्सर पौषवद्य द्वितीया २ रोजीं हे आचार्य कुंभकोणासच समाधिस्थ झालेत ।

६३ त्रेसष्टावे पीठस्थ महादेवेंद्रसरस्वती जन्मभूमी कुंभकोण कर्नाटक ब्रांम्हण पूर्वाश्रम नाम अण्णू श्रौती हे केवल योगी राज होते सदोदित योगांतच निमग्न रहात असत एके समयीं असा चमत्कार झाला कीं हे अपल्या योगा सनावरच आरूढ असतानां अदृश्य झालेत । शोधांतीं समजलें कीं उत्तर कावेरीच उत्तर तीरावर बसले आहेत हे वर्तमान तंजावरचे राजास कळतांच राजा स्वत: त्या ठिकाणी जाऊन त्यांस (आचार्यांस) परत कुंभकोणास आणून पीठावर बसवता झाला कलिवर्ष ४८८३ ते ४९१४ पावेतों म्हणजे ३१ वर्षे पठिस्थ राहून ई. स. १८१२ श्रीमुखनाम मंवत्सर आशाढ शु. १२ रोजीं कुंभकोणांसच समाधी घेतली ।

६४ चौंसष्टावेंपीठस्थ चंद्रशेखरेंद्रसरस्वती जन्मभूमी कुंभकोण कर्नाटक ब्रांम्हण बापाचें नांव अय्यंदीक्षित

पूर्वाश्रम नाम व्यंकटसुब्रंम्मण्यदीक्षित हे मंत्र शास्त्रांत प्रवीणहोते जगदंबा प्रत्यक्ष येऊन याशीं भाषण करीत असे परंपरे प्रमाणे (मागील प्रमाणें) यांनीही जंबुकेश्वरीं अखिलांडेश्वरीचे कर्णफूलांत पुन्हां श्रीचक्रोद्धार केला व कांचीक्षेत्रीं कामाक्षीचे देवालय व तेथील चक्राचाही जीर्णोद्धार केला कांचीहून कुंभकोणास आल्या नंतर कांचींत असणारें देवालय व मठ लावारिस स्थितींत होतें तें यांनीं पुन: परत आपल्या ताब्यात घेतलें अर्थात सरकारांत कळवून सरकारमार्फत त्यावर आपला कब्जा केला ही वार्ता तंजावरचे शिवाजीमहाराजांनां कळतांच त्यांनीही यांचा बहुमान केला कलिवर्ष ४९१४ ते ४९५१ म्हणजे ३७ वर्षें पीठाधिकार चालवून ई. स. १८४९ साधारणनाम संवत्सर कार्तिक वद्य २ तेदिनि कुंभकोणांतच यांनी समाधी घेतली ।

६५ पांसष्टावेपीठस्थ महादेवेंद्रसरस्वती जन्मभूमी चोदेशांत मध्यार्जुन जाति कर्नाटक ब्रांम्हण पित्याचें नांव शेषाद्रि पूर्वाश्रम नाम महालिंग यांनी सेतु पासून जगन्नाथा पर्यंत संचार केला नेहमीं श्रीगदंबे प्रीत्यर्थ ब्रांम्हण संतर्पण म्हणजे ब्रांम्हण भोजन करीत असत सेतुपती

म्हणजे रामनाथ पुरचा राजा, नवसालपुरचे रामचंद्रमहाराज, विजयनगरचा, राजा केरळदेशचा राजा, इत्यादि राजे लोकांनी या आचार्यांचा बहुत सत्कार केला इतर मठांपेक्षां हें मठ श्रेष्ठ आहे अश्या लेखाचें एक मानपत्रही सरकार गवर्नमेंटनें यांसदिलें आहे हे कलिवर्ष ४९५१ तें ४९९१ पावतो म्हणजे ४० वर्षें पीठाधीकार चालवून ई. स. १८८९ विरोधीनाम संवत्सर फाल्गुन व. ३० रोजीं मधुरा जिल्ह्यांत स्नमापनोदन क्षेत्रीं समाधिस्थ झालेत ।

६६ सहासष्टावे पीठस्थ चंद्रशेखरेंद्सरस्वती जन्मभूमी क्षीरनदींचें तीरीं उदयंपाक पित्याचें नांव सीतारामशास्त्री मातेचें नांव मंगलम्मा पूर्वाश्रम नाम स्वामिनाथ यांनीं कुंभकोणचें मठ जीर्णझालें असें समजून त्यास पुन: बांधविलें गोश्रीनगरचे महाराज आणि रामनाथपुरचे सेतुपती या दोघांची यांच्यावर अतिश्रद्धा असे आणि त्या प्रमाणें यांचा सत्कारही ते दोघे राजे नेहमी भक्तीनें करीत असत हे संचारांत नेहमी जनांस तत्त्वोपदेश करीत असत हे कलिवर्ष ४९९१ ते ५००८ म्हणजे १७ वर्षें या पीठावर अधिकारी राहून ई. स. १७०६ पराभवनाम संवत्सर

माघ व. ८ रोजीं कांची समीप कलवा नामक ग्रामीं समाधी घेते झालेत ।

६७ सदुसष्टावे पीठस्थ महादेवेंद्रसरस्वती जन्मभूमि कावेरी तीरावर त्रिविसलूर नांवाचें गांवांत कर्नाटक ब्राह्मण बापाचें नाम नरसिंह मातेचें नांव लक्ष्मी पूर्वाश्रम नाम लक्ष्मीनरसिंह हे केवळ योगी होते सात दिवस पीठाधीश होते कांची समीप कलवा ग्रामांत समाधिस्थ झालेत ।

